रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ९
www.ramprahar.com
शनिवार २६ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## मुख्यमंत्री फडणवीसांनी दिल्लीत घेतल्या नेत्यांच्या गाठीभेटी



**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २५) दिल्ली दौऱ्यात अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेतल्या. यामध्ये गृह व सहकारमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान, मनोहरलाल खट्टर, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आदींच्या भेटीचा समावेश आहे. महाराष्ट्राशी संबंधित विविध प्रकल्पांवर तसेच विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी चर्चा केली. नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम आणि सदस्य राजीव गौबा यांचीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट घेतली. एफआरबीएम मर्यादा २५ टक्के असताना महाराष्ट्राने १८ टक्के इतकी ती राखल्याबद्दल नीती आयोगाने प्रशंसा केली.

अंतरंग
पेंधर येथे पावणे बारा लाखांचा मद्यसाठा जप्त; तिघे गजाआड/२
अलिबागमध्ये महिलेस दुखापत करून चोरीचा प्रयत्न/५
चौथ्या कसोटीत रूटचे शतक; इंग्लंडकडे आघाडी/८

# पावसाचा जोर, जनजीवन विस्कळीत

**अलिबाग, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. कर्जत, खालापूर, माणगाव, पोलादपूर तालुक्यांमध्ये दमदार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. खोपोलीतील सखल भागात पूरसदृष्य स्थिती निर्माण झाली, तर भिरा धरणातून ४१.६० घनमीटर प्रती सेकंद वेगाने विसर्ग सुरू करण्यात आला. त्यामुळे कुंडलिका नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्यात शुक्रवारी (दि. २५) सकाळी ८ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात ७०.७२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. माथेरानमध्ये सर्वाधिक १४४



मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला. त्या खालोखाल पोलादपूर तालुक्यात १२४ मिमी, कर्जतमध्ये १२२ मिमी, माणगाव ९७ मिमी, पेण ९४ मिमी, महाड ८३ मिमी, खालापूर ७५ मिमी, सुधागड ६३ आणि अलिबाग तालुक्यात ५० मिमी पावसाची नोंद झाली. दरम्यान,

## एक्सप्रेस वेवर दरड कोसळली

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर बोरघाटातील अमृतांजन ब्रिज येथे दरड कोसळली. यामुळे मुंबई लेनवरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यानंतर मलबा काढण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

हवामान विभागाने जिल्ह्याला दोन दिवसांना रेड अलर्ट जारी केला होता. गुरुवारी सकाळच्या आणि दुपारच्या सत्रात फारसा पाऊस पडला नाही, मात्र संध्याकाळनंतर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढण्यास सुरुवात झाली. रात्रभर पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. शुक्रवारी सकाळीही पावसाची संततधार कायम होती. त्यामुळे ठिकठिकाणी सखल भागात पाणी साचणे, वृक्ष उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे यासारख्या घटना घडल्या.

अतिवृष्टीमुळे खोपोली शहराच्या सखल भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. विहारी, काटरंग परिसर जलमय झाला. त्यामुळे खोपोलीतील शाळांना स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन सुट्टीबाबत निर्णय घेण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या.

# शकुंतला ठाकूर यांच्या निधीतून बेलपाडा येथे साकारली अंगणवाडीची नवीन इमारत

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या बेलपाडा गावात शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या १० लाख रुपयांच्या स्वनिधीतून अंगणवाडीसाठी नवीन इमारत बांधण्यात आली आहे. या इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २५) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या कार्यक्रमाला गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, माजी ग्रामपंचायत सदस्य इंदुमती पाटील, ग्रामसुधारणा मंडळाचे सचिव कर्णिक पाटील, भाजप नेते अरुण घरत, बेलपाडा गाव अध्यक्ष संतोष म्हात्रे, जे.डी. ठाकूर, वसंत म्हात्रे, गणेश पाटील, नामदेव पाटील, जगदीश पाटील, किरण म्हात्रे, सोमनाथ म्हात्रे, अशोक घरत, प्रवीण म्हात्रे, महेंद्र म्हात्रे, अंकुश पाटील, नाथा घरत, तुकाराम ठाकूर, अतिश पाटील, प्रकाश कडू, पंकज पाटील, अशोक पाटील, मधुकर म्हात्रे, मनोहर म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

कोणताही पक्षभेद न मानता काम केले की पक्ष वाढतो. त्यामुळेच भारतीय जनता पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केले.



# पनवेलमध्ये २ ऑगस्टला महारोजगार मेळावा

## नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची सुवर्णसंधी!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवकांच्या समस्यांची जाण असलेले कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने २ ऑगस्ट रोजी खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात महारोजगार मेळावा २०२५ आयोजित करण्यात आला आहे.

या महारोजगार मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे असून विविध क्षेत्रातील नामांकित व प्रतिष्ठित कंपन्या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांना या माध्यमातून प्रत्यक्ष नोकरीसाठी निवड होण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या



मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर पदवीप्राप्त तसेच अकुशल उमेदवारही सहभागी होऊ शकतात. कंपन्यांच्या विविध विभागांमध्ये भरतीसाठी विविध प्रकारच्या पात्रता आणि क्षमतांनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हजारो रिक्त पदांवर भरती मेळाव्यात होणार आहे.

मेळाव्याद्वारे परिसरातील बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवरच रोजगार मिळवण्याची संधी निर्माण होत असून उद्योग आणि रोजगार यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने यंदाही महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्यात सहभाग व अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी ९९३००७४५८७ किंवा ९९२०७६५७६५ या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच या रोजगार मेळाव्याचा लाभ घेऊन युवकांनी आपले भविष्य घडवावे, असे आवाहन भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने करण्यात आले आहे.

## शाळेचे छत कोसळून सात विद्यार्थ्यांचा मृत्यू

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थानच्या झालावाड मनोहरथाना ब्लॉकमधील पिपलोडी येथे एका शासकीय शाळेच्या इमारतीचे छत कोसळून सात विद्यार्थ्यांचा मृत्यू, तर नऊ जण गंभीर जखमी झाले आहेत.

गावकऱ्यांनी सांगितले की, सकाळपासूनच पाऊस पडत होता. प्रार्थनेची वेळ झाली तेव्हा पावसामुळे मुलांना शाळेच्या एकत्र करण्याऐवजी वर्गखोलीत बसवण्यात आले त्यानंतर काही वेळातच छत कोसळले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

# नरेंद्र मोदी बनले सर्वाधिक काळ राहिलेले भारताचे दुसरे पंतप्रधान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहिलेले देशातील दुसरे नेते बनले आहेत. त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधींना मागे टाकले. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात भारताने अद्वितीय कामगिरी केली आहे.

इंदिरा गांधी या १९६६ ते १९७७दरम्यान ४,०७७ दिवस पंतप्रधानपदावर राहिल्या होत्या, तर शुक्रवारी (दि. २५) नरेंद्र मोदींची पंतप्रधानपदाची कारकीर्द ४,०७८ दिवस इतकी झाली. या बाबतीत पंतप्रधान मोदी आता फक्त देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या मागे आहेत. ते सर्वात

## इंदिरा गांधींना टाकले मागे



जास्त काळ पंतप्रधानपदावर राहिले आहेत.

मोदी स्वातंत्र्यानंतर जन्मलेले भारतातील पहिले पंतप्रधान आहेत, जे सर्वात जास्त काळ राहणारे बिगर-काँग्रेसी पंतप्रधान आहेत. उल्लेखनीय म्हणजे पंतप्रधान मोदी हे दोन पूर्ण टर्म पूर्ण करणारे आणि स्पष्ट बहुमताने दोनदा पुन्हा निवडून येणारे पहिले बिगर-काँग्रेसी नेते आहेत. १९७१मध्ये इंदिरा गांधींनंतर सलग सार्वत्रिक निवडणुकीत पूर्ण बहुमताने सत्तेत येणारे ते पहिले विद्यमान पंतप्रधान आहेत. इतकेच नाही, तर त्यांनी सलग तीनवेळा आपल्या पक्षाला विजय मिळवून दिलाय.

पंतप्रधान मोदींचा राजकीय प्रवास जितका उल्लेखनीय, तितकाच तो दमदार आहे. आता ते एक जागितक नेते म्हणून ओळखले जातात. जवळजवळ २४ वर्षांच्या राजकीय प्रवासात त्यांनी स्वतःला आंतरराष्ट्रीय नेत्यामध्ये रूपांतरित केले आहे.





पनवेल : चातुर्मास प्रारंभानिमित्त श्री जैन श्वेतांबर स्थानक, कापड बाजार येथे आचार्य सम्राट आनंद ऋषी १२५ बी यांच्या जन्म जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले व प्रवचनाचा लाभ घेतला.

# प्रेयसीचा खून करून प्रियकर पोलीस ठाण्यात

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

पैशाची मागणी आणि खोटा बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याने संतप्त प्रियकराने प्रेयसीचे डोके दगडावर आपटून निर्घृण खून केला. त्यानंतर मृतदेह दौलताबाद घाटात फेकून आरोपी स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाला. ही थरकाप उडवणारी घटना गुरुवारी रात्री घडली असून शुक्रवारी (दि. २५) सकाळी खळबळजनक प्रकार उघडकीस आला.

दिपाली गणेश आस्वार (वय १९, रा. माळीवाडा, ता. कन्नड) असे मृत युवतीचे नाव असून ती सध्या कन्नड येथे बहिणीकडे राहत होती. मांडकी (ता. वैजापूर) येथील सुनील सुरेश खंडागळे (वय २१) याच्यासोबत गेल्या काही महिन्यांपासून तिचे प्रेमसंबंध होते. गुरुवारी सुनीलने वडिलांची दुचाकी घेऊन कन्नड गाठले आणि दिपालीला भेटला. दिवसभर ते वेगवेगळ्या ठिकाणी फिरले. संध्याकाळनंतर ते दौलताबाद घाटात गेले. तेथे दोघांमध्ये तीव्र वाद झाला. वादाचे मूळ कारण म्हणजे दिपालीने एक लाख रुपये मागितले आणि पैसे न दिल्यास बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करेन, अशी धमकी दिली. या प्रकाराने संतप्त झालेला सुनील नियंत्रण हरपून गेला. रागाच्या भरात त्याने दिपालीचे डोके दगडावर आपटून तिचा खून केला. नंतर मृतदेह घाटात ढकलून देऊन तो निघून गेला.

घटनेनंतर काही तासांतच सुनीलने थे शिऊर पोलीस ठाण्यात जाऊन खुनाची कबुली दिली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## २५ ओटीटी ॲपवर बंदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डिजिटल प्लॅटफॉर्मवरील अश्लील आणि असभ्य कंटेटविरोधात केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. उल्लू, ऑल्टबालाजीसह एकूण २५ ओटीटी प्लॅटफॉर्मसह अनेक ॲप आणि वेबसाईट्सवर बंदी घालण्यात आली आहे.

एएलटीटी, उल्लू, बिग शॉट्स ॲप, डेसिफ्लिक्स, बूमेक्स, नवरासा लाईट, गुलाब ॲप, कंगन ॲप, बुल ॲप, जलवा ॲप, वॉव एंटरटेनमेंट, लूक एंटरटेनमेंट, हिटप्राइम, फेनिओ, शोएक्स, सोल टॉकीज, अड्डा टीव्ही, हॉटएक्स व्हीआयपी, हलचल ॲप, मूडएक्स, निऑनएक्स व्हीआयपी, फुगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स या सॉफ्ट पॉर्न दाखविणाऱ्या प्लॅटफॉर्मवर बंदी आणण्यात आली आहे. या कारवाईमुळे डिजिटल मनोरंजन विश्वात खळबळ उडाली आहे.



# ३.७७ कोटींचा गुटखा जप्त, चौघे अटकेत

## नवी मुंबई अमली पदार्थविरोधी कक्षाची भिवंडीत कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने भिवंडी आणि मध्य प्रदेशातून आणलेला तब्बल तीन कोटी ७७ लाख २८ हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पाच कंटेनर आणि चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुटख्याचा साठा महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला गेल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. दरम्यान, आरोपींनी सदर गुटख्याचा साठा कोठून आणला आणि कोठे विक्रीसाठी नेला जाणार होता? याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने मुंबई-पुणे महामार्गावर कामोठे येथे सापळा लावून भिवंडी येथुन कामोठे येथे विक्रीसाठी आणण्यात आलेला टेम्पो पकडला होता. या कारवाईत पोलिसांनी फरहान माजिद शेख (वय २३) या तरुणाला अटक करुन टेम्पोसह तब्बल २२ लाख ४० हजार रुपये किंमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला होता. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने आरोपी फरहान याची अधिक चौकशी केली असता, त्याने सदर गुटख्याचा साठा भिवंडीतील येवई गावातून आणल्याची कबुली दिली. फरहान शेखकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, सुरज गोरे यांनी तीन पोलीस अधिकारी आणि २० पोलीस अंमलदार यांच्या मदतीने नाशिक-ठाणे महामार्गावरील येवई गावात छापा टाकला. या ठिकाणी प्रतिबंधित गुटख्याने भरलेले चार कंटेनर आढळून आले.

### आरोपींना पोलीस कोठडी

***या संपूर्ण कारवाईत पाच कंटेनरसह तब्बल तीन कोटी ७७ लाख रुपये किंमतीचा गुटख्याचा साठा जप्त करून एकूण चार आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी दिली. कामोठे येथील कारवाईत पकडण्यात आलेला आरोपी फरहान शेख याला न्यायालयाने पोलीस कोठडी ठोठावली असल्याचे राजपूत यांनी सांगितले.***

या कारवाईत पोलिसांनी तीन चालकांसह गुटख्याने भरलेले चारही कंटेनर बेलापूर येथील अंमली पदार्थ विरोधी कक्षात आणले. त्यानंतर अन्न-औषध प्रशासनाच्या अधिकऱ्यांच्या मदतीने त्याची तपासणी केली असता चारही कंटेनरमध्ये तब्बल तीन कोटी ५४ लाख ८८ हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा असल्याचे आढळून आले. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने जितेंद्र मांगीलाल वसुनिया, भूपेंद्र राजेंद्र सिंग आणि भंवर खेमराज सिंग या तीन चालकांना अटक केली.

# अमेरिकेतील मराठी शाळांना महाराष्ट्र शासनातर्फे अभ्यासक्रम देऊ -ना. शेलार

**सॅन फ्रान्सिस्को : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील मराठी शाळांना महाराष्ट्र शासनातर्फे अभ्यासक्रम देऊ, असे आश्वासन राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी दिले.



अमेरिका दौऱ्यावर असणाऱ्या ॲड आशिष शेलार यांनी कॅलिफोर्निया राज्यातील सॅन फ्रान्सिस्को येथील बे एरिया येथे मराठी शाळा चालवणाऱ्या महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली. सेवा भावाने एकत्र आलेली मराठी माणसे आपल्या मुलांना मराठी भाषा, संस्कृती, इतिहास आणि आपल्या महाराष्ट्रातील लोकपरंपरा शिकवून मराठीचा संस्कार आपल्या नव्या पिढीवर व्हावा म्हणून इथे शाळा चालवतात. सन २००५ पासून ही शाळा चालवली जाते. सुमारे ३०० विद्यार्थी इथे मराठी शिकत आहेत.

अमेरिकेत अशा ५० हून अधिक शाळा या मराठीच्या असून काही सेवा भाव ठेवून इथली मराठी माणसे या शाळा चालवत आहेत. अमेरिकेतील स्थानिक प्रशासनाला जर महाराष्ट्र शासनाने शिफारस केली तसेच अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला तर मराठी भाषा शिकवणे, परिक्षा व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देणे सुलभ होईल, असे या शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी या भेटीत लक्षात आणून दिले.

दरम्यान, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांच्याशी चर्चा करुन महाराष्ट्र शासनाचे आवश्यक ते सहकार्य व शिफारस, अभ्यासक्रम नक्की देईल, असे आश्वासन मंत्री शेलार यांनी अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळाला दिले आहे.

# लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पदभरतीचा मार्ग मोकळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी २८५ नवीन पोलीस पदे भरण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. विमानतळावरील चेकपोस्टसाठी ही पदे असणार असून, यासाठी १० कोटी १० लाख ८८ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. यामुळे पदभरतीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा सप्टेंबर महिन्यापासून सुरू करण्याची योजना आखली आहे. हे विमानतळ पनवेल आणि उलवे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात येते. सिडको प्रशासनाने या विमानतळासाठी उलवे, गणेशपुरी, तरघर, कोंबडभुजे, वाघीवली गाव, वाघीवली पाडा, वरचे ओवळा, कोपर, कोल्ही, चिंचपाडा येथील गावांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. या विमानतळामुळे मुंबई महानगरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर हे विमानतळ प्रतिवर्षी नऊ कोटी प्रवासी वाहतुकीचे नियोजन करणार असल्यामुळे विमानतळावर सुरक्षा अत्यंत महत्त्वाची ठरते. विमानतळावरील इमिग्रेशन चेकपोस्टसाठी २८५ पदे नव्याने तयार करण्याचा प्रस्ताव गृह विभागाच्या विचाराधीन होता. अखेर या प्रस्तावाला नुकतीच राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

या पदनिर्मितीसाठी १० कोटी १० लाख ८८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे, याबाबतचा शासन निर्णय देखील प्रसिद्ध झाला आहे. या निर्णयामुळे विमानतळाच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळणार आहे.

# बस आणि ऑटो रिक्षाचा अपघात

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत कल्याण राज्य मार्गावरील अपघाताची मालिका सुरूच असून आज एकीकडे मुसळधार पाऊस कोसळत असताना बस आणि ऑटो रिक्षामध्ये अपघात घडला. सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी ऑटो रिक्षातील चालक आणि एक प्रवासी जखमी झाला असून रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे.

या वेळी स्थानिकांनी एकाच गर्दी केली होती.बस चालकाने मागून रिक्षाला धडक दिल्याने रिक्षा रस्त्यावर उलटली.यामुळे काही काळ येथे वाहतूक खोळंबली होती.



कर्जत कल्याण राज्य मार्गावरील डिग्निटी या वृद्ध आश्रम परिसरात हा अपघात दुपारी तीन वाजण्याच्या सुमारस घडला. कर्जत येथून नेरळ माथेरान प्रवाशी भरून निघालेली ही सरकारी मिनी बस पुढे धावत असणाऱ्या ऑटो रिक्षाला धडकली.ऑटो रिक्षा चालक हा कर्जत जवळील पोसरी येथील असून चालक आणि त्याचा मित्र असे दोघेच रिक्षातून नेरळ दिशेला प्रवास करीत होते. दरम्यान भरधाव येणाऱ्या माथेरान मिनी बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने चालकाने रिक्षाला मागून धडक दिली. यामध्ये रिक्षा रस्त्यावर उलटली.

चालक आणि त्याचा मित्र यामध्ये थोडक्यात बचावला असून किरकोळ जखमी झाले होते, मात्र या अपघातात ऑटो रिक्षा वाहनाचे मोठे नुकसान झाले होते. या वेळी स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत रस्त्यावर गर्दी केल्याने काही काळा वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता.

# पेणमधील साई मंदिरात चोरी

## ३० हजार रुपये किमतीच्या वस्तू लंपास

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील कासार तलाव येथील साई मंदिरात अज्ञात चोरट्याने चोरी करून ३० हजार रुपये किंमतीच्या वस्तू लंपास केल्याची घटना घडली आहे.




याबाबत माहिती अशी कि, पेणमधील कासार तलाव येथे साई मंदिर असून मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. तसेच सायंकाळी नागरिक येथील परिसरात फिरायवास येत असतात. रविवार २० जुलै रोजी सकाळी ११: ०० च्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरटयाने साई मंदीरात प्रवेश करुन मंदीरातील एकूण ३० हजार रुपये किंमतीच्या वस्तु स्वत:चे फायदयाकरिता चोरी करुन घेवुन पोबारा केला.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात फिर्या दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्याविरोधात पेन पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. १३३/ २०२५ भा.न्या.सं. २०२३ कलम ३०५ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार भोईर हे करीत आहेत.

# महाविद्यालयात प्लेसमेंट ड्राईव्ह

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.२४) करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट कमिटी आणि इन्ट्रीगो कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्व नियुक्ती सादरीकरण व मुलाखतीचे यशस्वीरित्या आयोजन केले होते.

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना नीतू शुक्ला (मॅनेजिंग डायरेक्टर) व प्रेम नायर (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांचे प्रोफाइल बारकाईने तपासून त्यांच्या सविस्तर मुलाखती घेतल्या व सुमारे २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इन्ट्रीगो कंपनीमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे तसेच महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला तसेच त्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. अर्पिता नायक समन्वयक, करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट कमिटी यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे प्रा. आकांक्षा त्रिपाठी, प्रा. शिवानी सोनकर, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. रूपाली नागरेकर, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे.



# महाड जिल्हा परिषद मतदारसंघ रचनेबाबत भाजपकडून हरकत दाखल

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद निवडणूक प्रारूप प्रभाग रचनेचा नमुना जाहीर झाल्यानंतर या रचनेवर भाजपचे माजी तालुका सरचिटणीस महेश शिंदे यांनी हरकत नोंदवून रचना बदलण्याची मागणी केली आहे. या वेळी त्यांच्यासोबत अनिल मोरे, चंद्रजीत पालांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते




रायगड जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मतदार संघाची प्रारूप प्रभाग रचना नमुना जिल्हाधिकारी यांच्याकडून जाहीर करण्यात आली असून, २१ जुलै २०२५ रोजी यावर हरकत घेण्याचे अंतिम मुदत होती. या मुदती अंती भाजपाचे माजी तालुका सरचिटणीस महेश शिंदे, अनिल मोरे व चंद्रजीत पालांडे यांनी महाड तहसीलदार महेश शितोळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन भौगोलिक रचना व दळणवळण संपर्क या मुद्यानुसार हरकतीचे पत्र सादर केले. दरम्यान या हरकतीनुसार शिंदे यांनी महाड तालुक्यात जिल्हा परिषदचे पाच मतदारसंघ असून जाहीर केलेल्या नमुना नुसार ५३ बिरवाडी, ५४ ठरवली, ५५ नडगाव तर्फे बिरवाडी, ५६ दासगाव व ५७ करंजाडी अशी रचना असून महेश शिंदे यांच्या हरकतीनुसार ५३ बिरवाडी विभागातील निजामपूर, पाचाड, सांदोशी व सावरट या ग्रामपंचायत वगळून ५३ बिरवाडी विभागात नडगाव तर्फे बिरवाडी व कांबळे तर्फे बिरवाडी या ग्रामपंचायतीचा समावेश करावा. तसेच ५४ खरवली विभागातील शिरगाव व कोथीरी या ग्रामपंचायत वगळून त्यांचा ५७ करंजाडी या विभागात समावेश करावा. तसेच ५६ दासगाव या विभागातील मोहोप्रे ग्रामपंचायत वगळून त्याचा ५६ नडगाव तर्फे बिरवाडी अर्थात नाते-रायगड या विभागात समावेश करावा अशी हरकत घेतली आहे.

त्याचप्रमाणे ५५ नडगाव तर्फे बिरवाडी हे विभागाचे नाव बदलून त्याचे ५५ नाते-रायगड विभाग असे करावे व ५७ करंजाडी हे विभागाचे नाव बदलून त्याचे ५७ विन्हेरे विभाग असे करावे. ५४ खरवली हे विभागाचे नाव बदलून त्याचे ५४ वरंध विभाग असे करण्यात यावे. नुकत्याच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निजामपूर या ग्रामपंचायतीचे नाव बदलून रायगड वाडी ग्रामपंचायत असे केले आहे, तोदेखील बदल या वेळी करण्यात यावा असे देखील महेश शिंदे यांनी हरकतीत नोंदवले आहे. या प्रकरणी अजून पर्यंत पाच हरकती दाखल झाल्या असून लवकर याची रायगड जिल्हा अधिकारी यांच्या समोर सुनावणी होणार असल्याचे तहसीलदार यांनी सांगितले.

# पनवेलमधील पेंधर येथे पावणे बारा लाखांचा मद्यसाठा जप्त

## तीन आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

राज्य उतपादन शुल्क विभाग पनवेल ग्रामीणने पेंधरजवळ सापळा लावून एका चारचाकी वाहनामधून व एका खोलीमधून असा मिळून ११ लाख ८५ हजार ५९५ रुपयाचा मद्यसाठा हस्तगत केला असून या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग जि. रायगड यांनी तळोजा पोलीस स्टेशन हद्दीत योगेश वजन काट्यासमोर पेंधर तळोजा एमआयडीसी ता. पनवेल जि. रायगड येथे दारुबंदी गुन्ह्याकामी सापळा रचण्यात आला. यामध्ये एका चारचाकी वाहनामध्ये उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या १७ बाटल्या व दोन मोबाईल असा एकूण ५,४४,३३० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. नंतर पेंधर येथील एका पत्र्याच्या खोलीमध्ये जाऊन उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या ५४ बाटल्या, विदेशी मद्याच्या ४२ बाटल्या, रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे, बनावट कागदी लेबले व इतर साहित्य असा एकुण ६,४१,२९५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. यादोन्ही ठिकाणी मिळून एकूण ११,८५,५९५ रुपये इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे १) संतोष उरथ २) बिजु उरथ ३) बिनु कल्लूर या इसमांवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली.

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई राजेश देशमुख, संचालक, अंमलबजावणी व दक्षता, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, प्रसाद सुर्वे, मा. विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे जि.



ठाणे प्रदीप पवार, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग रविकिरण कोले, व मा.उप-अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड- अलिबाग बाबासाहेब भूतकर यांचे मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

कारवाई निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पनवेल ग्रामीण विभाग अनिल जी. बिराजदार, दुय्यम निरीक्षक बीट क्र. १- अजित बडदे, दुय्यम निरीक्षक बीट क्र.३ योगेंद्र लोळे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गैनिनाथ पालवे, जवान निखील पाटील, जवान वाहनचालक सचिन कदम यांनी यशस्वीरित्या पार पाडली. सदरील गुन्हयाचा पुढील तपास रविकिरण कोले, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली अजित बडदे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग क्र.१ जि. रायगड हे करीत आहेत.

# पनवेलमध्ये दुचाकी वाहनांना आकर्षक क्रमांकासाठी नवीन मालिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना दुचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २९ जुलै २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खासगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी केले आहे.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दि. २९ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन ३० जुलै २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा धनाकर्षण (DD) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा अतिरीक्त धनाकर्षण कमीत कमी ३०१ रुपयांचा असावा त्यापेक्षा कमी रकमेच्या धनाकर्षण विचार केला जाणार नाही. सदर अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहृ अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही. आकर्षक क्रमांकासाठी आगाऊ स्वरुपात अर्ज स्विकारत असून चालू मालिका संपल्याशिवाय नवीन मालिका सुरू होणार नाही. तसेच आगाऊ प्रक्रियेमध्ये स्विकारलेल्या अर्जाच्या धनाकर्षण च्या पावत्या, जुन्या मालिकेतील पूर्ण नंबर संपल्याशिवाय नवीन मालिकेतील पावत्या जारी केल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

# २९ कोटी ५६ लाखांची मालमत्ता करवसुली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने १८ जुलै रोजी अभय योजना जाहिर केली असून गेल्या आठ दिवसात २९ कोटीं ५६ लाखाची वसुली केली आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून मालमत्ताकर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली योग्य उपाययोजना राबवत रोज सुमारे चार कोटी महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा होत आहे.

दरम्यान, चारही प्रभागामध्ये तसेच पालिका मुख्यालयात नागरिकांच्या मालमत्ताकराविषयीच्या सर्व तक्रारी सोडविण्यावरती भर दिला जात आहे. तसेच नागरिकांच्या मालमत्ताकर बिलामधील दुरूस्ती मालमत्ता कर विभाग तात्काळ करून देत आहेत. यासाठी सुट्टीच्या दिवशी शनिवार व रविवारदेखील महापालिकेची कार्यालये सुरू ठेवण्यात येणार आहे.

अभय योजनेचे चार महत्वाचे टप्पे आहेत. यामध्ये प्रामुख्याने १८ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे. तसेच १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ७५ टक्के सूट मिळणार. तसेच या पुढील काळात म्हणजे १ सप्टेंबर २०२५ ते १० सप्टेंबर कालावधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळेल. आणि ११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास असलेल्या शास्तीमध्ये २५ टक्के सूट मिळणार आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईट, PMC TAX -PP अथवा पनवेल कनेक्ट पद्वारे नागरिकांनी मालमत्ता कर ऑनलाईन भरल्यास त्यांना २ टक्के सवलत मिळेल तसेच चालू वर्षाचा म्हणजे २०२५-२६ चा कर ३१ जुलैपर्यंत भरल्यास त्यांना या करामध्ये ५ टक्के सूट मिळेल, तरी नागरिकांनी लवकरात लवकर कर भरणा करून याचा लाभ घ्यावा असे मालमत्ता कर उपायुक्त स्वरूप खारगे यांनी आवाहन केले आहे.

महापालिकेने नवीन मालमत्ता कर संकलन केंद्रे सुरू केली आहेत.

१.मालमत्ता कर संकलन केंद्र - प्राईड सोसायटी सेक्टर ७, खारघर २. महा ई सेवा केंद्र - गंगा टॉवर, सेक्ट र २१ कामोठे ३. महा ई सेवा केंद्र - ऍलियश बिल्डींग से१७ प्लॉट नं८४ मोठा खांदा नवीन पनवेल ४. सर्व ५ प्रभाग कार्यालये (नावडे उपविभागासहित)


५. मुख्यालय पनवेल

तरी आत्ता आणि एकदाच असलेल्या अभय योजनांचा लाभ संबधित नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## दुखवटा

### दत्तात्रय पडवळ

**माणगाव :** शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेचे सल्लागार राकेश पडवळ यांचे पिताश्री दत्तात्रय काशिनाथ पडवळ (वय ७४) यांचे सोमवारी (दि.२१) निधन झाले. त्यांच्या पश्च्यात एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महान येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. दत्तात्रय पडवळ यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.३०) तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.१ ऑगस्ट) महान - रामराज येथे होणार आहे.



# खारघरच्या सेंट्रल पार्कची दुरवस्था

## देखभाल, सुरक्षेकडे सिडकोने लक्ष देण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील सिडकोच्या अंतर्गत येणारे सेंट्रल पार्क हे नवी मुंबईतील एक महत्त्वाचे व सर्वाधिक लोकप्रिय असे सार्वजनिक उद्यान मानले जाते, मात्र अलीकडच्या काळात या उद्यानाची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली असून, यामध्ये अनेक धोकेदायक गोष्टी उद्भवत आहेत. स्थानिक नागरिक आणि नियमित भेट देणाऱ्या पर्यटकांच्या वतीने तक्रारी मांडण्यात आल्या आहेत. याबाबत भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांनी माहिती दिली आहे.





**वाद्य उपकरणांची दुरवस्था**

उद्यानातील संगीत क्षेत्रातील अनेक वाद्ये तुटलेली आहेत किंवा गायब आहेत. यामुळे लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**छत व शेड्सचे नुकसान**

बैठकीच्या जागांवरील शेड्स व छतांची अवस्था खराब असून काही ठिकाणी ते फाटलेले किंवा उडून गेले आहेत, ज्यामुळे पावसात नागरिक ओले होतात.

**योगा बेंचेस तुटलेले**

योगा व ध्यान क्षेत्रात ठेवलेल्या अनेक बाकड्या मोडकळीस आलेल्या आहेत, ज्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना अपघाताचा धोका आहे.

**गवत वाढलेले**

पावसाळ्यात अनेक ठिकाणी गवत भरभरून वाढले असून, त्यामुळे चालणे अवघड झाले आहे व साप, कीटक व घसरण्याचे प्रमाण वाढले आहे.

**शौचालयांची दुरवस्था**

उद्यानातील सार्वजनिक शौचालये स्वच्छ ठेवली जात नाहीत. त्यामुळे अस्वच्छतेची परिस्थिती निर्माण झाली आहे.

**अपघातप्रवण परिसर**

उद्यानातील अनेक भागात पावसामुळे आणि अयोग्य देखभालीमुळे नागरिक घसरून पडत आहेत. मार्गावर शेवाळ, तुटलेले दगड व खड्डे हे मुख्य कारण आहेत. या परिस्थितीमुळे सेंट्रल पार्क एक आनंददायी जागा न राहता, अपघात व त्रासदायक अनुभव देणारी जागा बनली आहे.

**सिडको प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन, उद्यानाची योग्य दुरुस्ती, स्वच्छता मोहीम व नियमित देखभाल सुरू करावी, अशी विनंती रहिवाशांच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा येणाऱ्या काळात यामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**–ब्रिजेश पटेल, रायगड जिल्हा सचिव, भाजप,**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शाळेच्या विकासासाठी आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा बिभवी या शाळेच्या विकासासाठी दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तब्बल दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली असून या मदतसह धनादेश शुक्रवारी (दि. २५) सुपूर्द करण्यात आला.

या वेळी बिभवी शाळेच्या वतीने आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. सत्कारावेळी शाळेचे मुख्याध्यापक अशोक लकडे, गणपत जाधव, लक्ष्मण दुंदळे, दत्तात्रय जाधव, ज्ञानदेव नवले, नामदेव बांदल, प्रभाकर जाधव, प्रकाश जाधव, राजेंद्र जाधव, अरुण साळुंखे, सूरज जाधव, गणेश नवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात, शाळेला विकास निधी मिळवून देण्यासाठी अत्यंत मोलाचे कार्य केल्याबद्दल बिभवी गावचे सुपुत्र सुरज प्रकाश जाधव यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते हस्ते सत्कार करण्यात आला. या निधीमुळे बिभवी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे.



# नवीन पनवेलमधील शिबिरात ७८ जणांचे रक्तदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल शहर मंडळ अंतर्गत महाराष्ट्र राज्याचे धडाडीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शहर मंडळाचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या नेतृत्वात मंगळवारी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत भाजपचे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, संतोष शेट्टी, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, सुशीला घरत, रोटरीचे माजी अध्यक्ष आनंदी ग्रुपचे अध्यक्ष संजय पाटील (गुरु) भाजप सरचिटणीस भिमराव पोवार, कामगार नेते मोतीराम कोळी, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, गोपीनाथ मुंडे, प्रभाग अध्यक्ष शांताराम महाडिक, विजय म्हात्रे, युवा मोर्चाचे तसेच महिला मोर्चाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

शिबिरमध्ये एकूण १०३ रक्तदाते उपस्थित होते. त्यापैकी ७८ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्राला मदत केली.

# पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**पनवेल, उरण : रामप्रहर वृत्त**

पीक विमा भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ असून यानंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. शेतकऱ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न बघता पीकविमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

स्थानिक जिल्हा नियोजन भवन येथे खरिप हंगाम २०२५ मधील राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या भितीपत्रकाचे अनावरण झाल्यापासून १ ते ३१ जुलै २०२५पर्यंत पीकविमा काढण्यासाठी सुरुवात झालेली आहे. उरण तालुक्यातील चिरनेर तसेच पनवेल तालुक्यातील साई गावात पीकविमा योजनेबाबतची कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी भारतीय कृषी बीमा कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक पुरुषोत्तम सरनाईक व तालुका व्यवस्थापक अनिल तांडेल, कृषी सहाय्यक ढालपे आदी उपस्थित होते. यावर्षी महाराष्ट्र शासनातर्फे पीकविमा योजनेमध्ये अत्यंत चांगले बदल करण्यात आले असून ते शेतकऱ्यांच्या हिताचे आहेत. शेतकऱ्यांनी काही शंका असल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पनवेल येथे भेट द्यावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले. पीकविमा हे कृषी ऑफिस, स्थानिक बँका, सीएससी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, शेतकरी यांना या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.



पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक घटक, कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसानभरपाई मिळेल.

# १६,८८७पैकी २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी सज्ज!

## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा







## वर्ग अंतर्गत फेरीला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य व नेतृत्वगुण विकसित व्हावेत या उद्देशाने कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी पनवेल परिसरातील विविध शाळांमध्ये मोठ्या उत्साहात पार पडली. त्या अनुषंगाने १६,८८७ पैकी २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी पात्र ठरले असून ते या फेरीसाठी सज्ज झाले आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (इंग्रजी माध्यम), चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (मराठी माध्यम), सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्बी, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारघर, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, केएसए बार्न्स स्कूल, पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ०१ ते ११ शाळा आदी शाळांचा सहभाग आहे. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत एकूण १६,८८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४०५ वर्गांमधून निवड झालेल्या २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी अर्थात दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. त्या अनुषंगाने विशेषतः आजपासून लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे आणि लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, कामोठे येथे शाळा अंतर्गत फेरीला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, माझं कुटुंब, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत अशा विषयांवर आपले विचार ठामपणे मांडले. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी एम. के.कोंगेरे, स्पर्धा प्रमुख व कोशिश फाउंडेशनचे उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, शिक्षक अनिल पाटील, दीपक खुटले, श्री. पेरवी यांच्यासह कोशिश फाउंडेशनचे स्वयंसेवक उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाला प्रोत्साहन देण्यासाठी कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्तम तयारीसह विचार मांडले असून पुढच्या फेरीसाठी ते अजून सज्ज होत आहेत.**

**–एम. के. कोंगेरे, मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी**

**विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज आहे. वक्तृत्वकला म्हणजेच नेतृत्व कलेचा पाया आहे. त्यामुळे हि स्पर्धा विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची उत्तम संधी आहे.**

**–मयुरेश नेतकर, स्पर्धा प्रमुख व उपाध्यक्ष कोशिश फाउंडेशन**

# भाजप कळंबोली शहर मंडळ कार्यकारिणी जाहीर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली शहर मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांनी कळंबोली शहर मंडळ कार्यकारिणी जाहीर केली आहे.

यामध्ये सरचिटणीसपदी दिलीप बिस्ट, आबासाहेब घुटुकडे, उपाध्यक्षपदी संदीप भगत, सुनील ढेंबरे, प्रियंका पवार, विनाद बोरसे, मनिषा निकम, जोहेब पटेल, सचिवपदी केशवलाल यादव, विलास किठे, सुनिता हिरवे, राजेंद्र बागल, निलेश भोईर, बायजा बारगजे, कोषाध्यक्षपदी प्रमिला पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# मोबाईल चोरटे गजाआड

**पनवेल :** शहर पोलीस ठाणे हद्दीतील उसर्ली गावामधील मोबाईल शॉप चे शटर उचकटवून अज्ञात चोरट्यांनी शॉपमधील ३० मोबाईल चोरी करून नेले होते. या घटनेबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

फिर्यादी सवाईसिंग भाटी यांच्या मोबाईल दुकानात चोरी होताच याबाबतची तक्रार पोलीस ठाण्यात करताच व पो नि नितिन ठाकरे यांनी तात्काळ दाखल गुन्ह्याची नोंद घेत पोलिसांनी बातमीदारामार्फत अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन आरोपी रोहन आर्या (वय २४, रा. कळवा) व त्याचा सहकारी विनायक रंगप्पा (वय १९, रा. कळवा) यांना अटक केली. त्यांच्याकडून सुमारे सात लाखांचे मोबाईल व रोख रक्कम हस्तगत केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोहवा माधव शेवाळे हे करीत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व खारघर येथील रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन केले.

विविध प्रकारची झाडे लावण्यात आली आणि परिसराच्या हरितीकरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले. ही मोहिम खारघरमधील रोटरी क्लबचे अध्यक्ष व सदस्य आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय स्वयंसेवक, आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी हा पर्यावरणीय उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अभिनंदन केले.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# साडी प्रदर्शन स्टॉलसाठी आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस व हातमाग दिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता महिला मोर्चा, पनवेल शहर मंडल आयोजित वस्त्रवारसा : हातमाग साडी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यात साडी विक्रीसाठी स्टॉल हवा असणाऱ्या महिला उद्योजिकांनी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्टॉलसाठीच्या निकषांमध्ये स्टॉलधारक महिला उद्योजिका पनवेल शहरात राहणारी असावी. स्टॉल हा फक्त साड्यांचा असेल. इतर कोणत्याही वस्तूंची अथवा खाद्यपदार्थांची विक्री तेथे करता येणार नाही. स्टॉल बुक करायची अंतिम तारीख २९ जुलै २०२५. स्टॉल बुकिंगसाठी खालील गूगल फॉर्म भरावा.https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSdnyiW7ZGlU0U2GqWOšgbBN59lšBlmitUP0M1aF7S15rhWštg/viewform?usp=header

हे प्रदर्शन आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत होणार असून अधिक माहितीसाठी भाजप महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष तथा माजी नगरासेविका रुचिता मुग्धा गुरुनाथ लोंढे (८५९१८१६६११) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोपर येथे नवचेतना मेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील खारकोपर येथे एकात्मिक बालविकास कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.२५) गव्हाण बीटातील सर्व २५ अंगणवाडीचा नवचेतना बालमेळावा राजिप कोपण (गव्हाण) शाळेतील सभागृहात अत्यंत उत्साहात झाला.

या मेळाव्याचे उद्घाटन शाळेचे चेअरमन अनंतशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ सदस्य रघुनाथशेठ देशमुख, बी.टी.कांबळे गुरुजी, शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना म्हात्रे व सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालकवर्ग उपस्थित होता.

या मेळाव्यात विविध दालनांमधून बालकांच्या विविध कृती व उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. सर्व बालके आनंदाने सहभागी झाले. या मेळाव्यासाठी सर्व अंगणवाडीताईंनी विशेष मेहनत घेतली.



## संपादकीय

# ऐतिहासिक व बळ देणारा करार

भारत आणि ब्रिटनमधील व्यापार आणि आर्थिक संबंधांसाठी गुरुवारचा दिवस ऐतिहासिक ठरला. दोन्ही देशांदरम्यान मुक्त व्यापार करार झाला असून या करारामुळे दोन्ही देशांतील एकूण व्यापारात मोठी वाढ अपेक्षित आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या उपस्थितीत गुरुवारी भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करण्यात आली. तीन वर्षांपूर्वी यासाठीच्या वाटाघाटी सुरू झाल्या होत्या. ब्रिटनमधील सत्तांतरे आणि प्रदीर्घ वाटाघाटींनंतर हा करार अस्तित्वात आला आहे. करारामुळे भारतातील बहुतांश उत्पादनांना ब्रिटनमध्ये करमुक्त प्रवेश मिळेल तर ब्रिटनमधून आपल्याकडे आयात होणाऱ्या मोटारी व मद्य आदी स्वस्त होईल. भारतातून ब्रिटनमध्ये निर्यात होणाऱ्या ९९ टक्के वस्तूंवर या करारामुळे यापुढे शून्य शुल्क असेल. भारतीय वस्त्रोद्योग, पादत्राणे, हिरे आणि दागिने, मत्स्योद्योग आदींना ब्रिटनची मोठी बाजारपेठ मिळेल. भारतातील कृषी उत्पादनांना ब्रिटनमध्ये अनेक संधी उपलब्ध होतील. त्यामुळे येत्या तीन वर्षांत ब्रिटनला होणाऱ्या कृषी उत्पादन निर्यातीत २० टक्के वाढ अपेक्षित आहे. ब्रिटनमधून आयात होणारी वाहने, मद्य आदी उत्पादनांचे सीमाशुल्क १५ टक्क्यांवरून तीन टक्क्यांवर आणले जाईल. महाराष्ट्रात कोकणातील आंबे-फणस, नाशिकची द्राक्षे व कांदा, कोल्हापुरी चप्पल यांना या करारामुळे फायदा होईल. भारतीयांना ब्रिटनमधील सेवा क्षेत्रातही रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून ब्रिटनमधील सुमारे ७५ हजार भारतीयांना 'सामाजिक सुरक्षा शुल्का'तून तीन वर्षांसाठी सूट दिली जाणार आहे. भारतातील योग प्रशिक्षक, शास्त्रीय संगीतकार आणि शेफ यांसारख्या कुशल व्यक्तींना ब्रिटनमध्ये सेवा प्रदान करणे सोपे जाणार आहे. अमेरिकेने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अन्य देशांतून अमेरिकेत आलेल्या व येऊ इच्छिणाऱ्या लोकांबाबत कठोर धोरण स्वीकारले असताना ब्रिटनचे त्यासंदर्भातील धोरण आशादायी दिसत असल्याने अनेकांना दिलासा मिळाला असेल. एकंदरच भारतीयांच्या ब्रिटनमधील व्यवसायविस्ताराला या करारामुळे गती येऊ शकेल. हा व्यापार करार देशाच्या रत्न आणि दागिने क्षेत्रासाठी नवीन संधी उघडणारा ऐतिहासिक करार आहे असे वर्णन त्या क्षेत्राकडून केले गेले आहे. ब्रिटनमध्ये भारतीय कोळंबीवर सध्या आकारले जाणारे ४.२ टक्के ते ८.५ टक्के शुल्क रद्द होणार असल्याने कोळंबी, टूना, फिशमील आणि फीड्सच्या निर्यातीत वाढ अपेक्षित आहे. भारतातून युरोपात ब्रिटनमध्ये सर्वाधिक औषधे निर्यात होतात. मुक्त व्यापार करारातील शून्य शुल्क तरतुदीमुळे तेथील बाजारपेठेत भारतीय जेनेरिक औषधांची स्पार्धात्मकता वाढण्याची अपेक्षा आहे. इतर अनेक वैद्यकीय उपकरणांवरही कोणतेही शुल्क लागणार नाही. त्यामुळे देशांतर्गत उत्पादने तेथे अधिक स्पर्धात्मक बनतील. एखाद्या पाश्चात्य देशासोबतचा भारताचा हा अशा स्वरुपाचा पहिलाच प्रमुख करार असून अपेक्षेप्रमाणे अंमलबजावणी झाल्यास यातून दोन्ही देशांच्या आर्थिक विकासाला निश्चितच बळ मिळेल. निव्वळ व्यापार व आर्थिक दृष्टीने नव्हे तर राजनैतिक दृष्टीनेही भारत व ब्रिटनदरम्यानचा हा करार महत्त्वाचा मानला जातो आहे. गेल्या अनेक दिवसांपासून भारत व अमेरिका यांच्यात व्यापार करारावर चर्चा चालू आहे. पण अमेरिकेआधी भारताने ब्रिटनसोबत मुक्त व्यापार करार केला आहे. अमेरिका भारताबरोबर व्यापार करार करण्याच्या अगदी समीप आहे असे ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते. भारत-अमेरिकेदरम्यान व्हावयाच्या कराराच्या दृष्टीनेही ब्रिटनसोबतचा हा व्यापार करार महत्त्वाचा मानला जातो आहे.**

# आज कारगिल विजय दिवस



कारगिलच्या लढाईत भारताने मिळवलेला विजय 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागवल्या जातात. कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्यांच्या शौर्याची आठवण सदैव जागृत ठेवणारा दिवस असून देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणारा दिवस आहे. २६ जुलै हा कारगिल दिन म्हणून साजरा होतो.

राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे; तर आग्नेयेकडील द्रास व नैऋत्येकडील मश्को खोऱ्यातील तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगील, द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असल्याने हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी आणि उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये कारगील युद्धाच्या आधीपर्यंत होता. या वेळेस मात्र भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली. या चौक्यांचा ताबा घेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १अ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यांत आला तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्यावरील किल्ल्यांप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. त्यातच अतिउंची व कडाक्याची थंडी काम अवघड करते.

सन १९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या छोट्या चकमकी होत आहेत. सियाचीन हिमनदी वर भारतीयांचे नियंत्रण तसेच सभोवतालचा परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असतात. १९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला तसेच १९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले. हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोत्री अतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला.

१९९८-९९च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले व कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १च्या जवळ यायचे. असे केले की, महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल आणि नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रण रेषा मान्य करायला भाग पाडले की. लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगिल/काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारताने जुलै१९९९च्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत अनेक महत्त्वाच्या लढाया केल्या व जागा ताब्यात मिळवल्या. (साभार : वेबदुनिया)

# मंत्री पंकजा मुंडे : संयम, स्वाभिमान आणि स्पष्टवक्तेपणाचे प्रतिक

राज्याच्या मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांचा आज वाढदिवस. ही केवळ शुभेच्छा देण्याची एक औपचारिकता नसून त्यांच्या नेतृत्वगुणांचा, कार्यपद्धतीचा आणि तत्त्वनिष्ठ राजकीय वाटचालीचा अभ्यास करण्याची एक प्रेरणादायी संधी आहे. त्यांच्या कार्याने आजच्या तरुणाईसमोर एक वेगळं, ठाम आणि लोकहितवादी नेतृत्व कसं असतं याचा वस्तुपाठ उभा केला आहे.

पंकजाताईंमध्ये एक वेगळी प्रगल्भता आहे. संयम, स्पष्टवक्ता वृत्ती आणि निर्णयक्षमतेचा अभूतपूर्व संगम आहे. त्यांच्या कार्यशैलीत कोणतीही गूढता नाही. जे शक्य नाही, ते स्पष्टपणे सांगण्याचं धैर्य त्यांच्याकडे आहे. खोट्या आश्वासनांनी जनतेची दिशाभूल करणं, अशक्य घोषणांनी प्रसिद्धी मिळवणं किंवा राजकीय स्टंट करणं त्यांच्या स्वभावात नाही. त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद म्हणजे त्यांची तत्वनिष्ठता. कार्यकर्त्यांना फ्री हँड देऊन टेंडर व्यवस्थापन, राजकीय फेवर, पोलीस हस्तक्षेप अशा गोष्टींपासून त्या स्वतःला दूर ठेवतात. त्यांच्या दृष्टिकोनात कार्यकर्ता पोषण हा उद्देश नाही, तर जनतेचं जीवनमान उंचावणं ही खरी दिशा आहे. त्यांचं ध्येय म्हणजे अंत्योदय - समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा किरण पोहोचवणं.

उतणार नाही, मातणार नाही, घेतलेला वसा टाकणार नाही हे मुंडेसाहेबांचं ब्रीदवाक्य त्यांच्या जीवनाचा सारांश आहे. पंकजाताई यांचा वैचारिक वारसाही हाच आहे तो म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज, आणि लोकहितासाठी अविरत झगडणं. मागील लोकसभा निवडणुकीत पंकजाताईंचा पराभव झाला, पण त्यांनी कधीही कोणावर



दोषारोप केला नाही की राजकीय स्कोर सेटल करण्यासाठी कुणावर खापर फोडलं नाही. ही त्यांच्या राजकीय परिपक्वतेची साक्ष आहे. त्यांच्याकडे मोठं मन आहे, ज्यात मातृत्व, क्षमाशीलता आणि लोकांच्या हितासाठी स्वतःचं 'मी' बाजूला ठेवण्याची ताकद आहे.

पंकजाताईंचं नेतृत्व तात्कालिक यशाच्या मागे धावत नाही. त्या भविष्याकडे पाहतात. गरज असेल तर प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचीही त्यांच्यात तयारी आहे. स्वतःचा स्वाभिमान बाजूला ठेवून समोरच्या कल्याणासाठी दोन पावलं मागे येण्याचीही त्यांच्यात दूरदृष्टी आहे. त्या कोणत्याही खात्याची जबाबदारी स्वीकारतात, तेव्हा संपूर्ण निष्ठेनं आणि पूर्ण क्षमतेनं त्या खात्याला नवी उंची देतात. जलयुक्त शिवार, मुलींच्या जन्मदरात वाढ, महिला बचतगटांसाठी उपक्रम, सक्षम सरपंचांसाठी सरपंच थेट निवड, ऑनलाईन बदल्यांची पारदर्शकता अशा अनेक योजना त्यांनी लोकसहभागातून यशस्वीपणे राबवल्या. केंद्र सरकारकडून सलग पाच पुरस्कार मिळवणं हे त्यांच्या खात्याच्या कामगिरीचं अढळ उदाहरण आहे.

पशुसंवर्धन विभागाला कृषीप्रमाणे स्वतंत्र दर्जा देणं ही क्रांतिकारी संकल्पना त्यांनी अमलात आणली. आज महाराष्ट्र या खात्याबाबतीत देशात अव्वलस्थानी आहे. त्याचबरोबर पर्यावरणासारख्या जागतिक मुद्द्यावर नाविन्यपूर्ण संकल्पना मांडून त्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या एक चळवळीला सुरुवात केली आहे. पंकजाताईंचं नेतृत्व केवळ राजकारणापुरतं मर्यादित नाही, तर त्यात सामाजिक जाण, आर्थिक समज, प्रशासकीय समन्वय, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे लोकांच्या भावनेची जाण आहे.

ज्या नेतृत्वाने राजकारणात विवेक, व्रत आणि वचन याची दिशा दिली, त्या स्त्रीचं नाव म्हणजे पंकजा गोपीनाथ मुंडे. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा पंकजाताई! आपणांस आयुष्यभर उत्तुंग यश, चांगलं आरोग्य आणि जनतेच्या सेवेची अखंड प्रेरणा लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**-बबन बारगजे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष, भटके विमुक्त आघाडी**



## बदलते तंत्रज्ञान

# दूरसंचार धोरण २०२५चा मसुदा जारी

केंद्र सरकारने राष्ट्रीय दूरसंचार धोरण २०२५चा मसुदा जारी केला आहे. या मसुद्यात सरकारने २०३०पर्यंत



देशाच्या दूरसंचार क्षेत्राला जागतिक दूरसंचार तंत्रज्ञानाचा अग्रेसर बनवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या धोरणात ९० टक्के नागरिकांना ५जी नेटवर्क, १० कोटी घरांना फिक्स्ड ब्रॉडबँड देणे आणि या क्षेत्रात १० लाख नवीन रोजगार निर्माण करणे हे उद्दिष्ट ठेवले आहे.

हे धोरण पायाभूत सुविधांचा विस्तार, स्थानिकीकरण आणि पर्यावरणपूरक कौशल्यांना प्रोत्साहन आणि विकास यावरही भाष्य करते तसेच ६जी, एआय, आयओटी आणि क्वांटम टेलिकम्युनिकेशन्ससारख्या तंत्रज्ञानाच्या नवोपक्रमाच्या बाबतीत भारताला टॉप-१० देशांमध्ये समाविष्ट करण्याचे लक्ष्यही यात आहे. भारताला दूरसंचार क्षेत्रात स्वावलंबी बनवण्याबाबतही चर्चा झाली आहे. यासाठी स्थानिक उत्पादनाला १५० टक्के प्रोत्साहन देण्याचे लक्ष्य आहे.

या धोरणाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, राष्ट्रीय दूरसंचार धोरण २०२५ भारताच्या डिजिटल भविष्यासाठी एक परिवर्तनकारी दृष्टीकोन प्रतिबिंबित करते. हे आर्थिक विकास, सामाजिक सक्षमीकरण आणि तंत्रज्ञान नवोपक्रमाचा मूलभूत आधारस्तंभ म्हणून दूरसंचार प्रति देशाच्या धोरणात्मक वचनबद्धतेचा पुनरुच्चार करते. मसुद्यात दूरसंचार क्षेत्रात येणाऱ्या बदलांचे आणि आव्हानांचे वर्णन केले आहे. यात पुढील पिढीतील तंत्रज्ञान ५जी, ६जी, एआय, आयओटी, क्वांटम कम्युनिकेशन, सॅटेलाइट नेटवर्क आणि ब्लॉकचेनचीही माहिती आहे.

प्रस्तावात असेही म्हटले आहे की, हे नवोपक्रम जागतिक मूल्य साखळीला आकार देत असल्याने, धोरण भारताला डिजिटल अंतर कमी करण्यासाठी, समावेशक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक डिजिटल लीडर म्हणून आपली भूमिका मजबूत करण्यासाठी सक्षम करते. या धोरणांतर्गत, सरकारने १० लाख सार्वजनिक वाय-फाय हॉटस्पॉट सुरू करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. एक नवीन डिजिटल इंडिया फंड योजना प्रस्तावित करण्यात आली आहे, ज्याचा उपयोग दुर्गम आणि मागासलेल्या भागात नेटवर्क विस्तारण्यासाठी केला जाईल.

# प्रतिभावंत संगीतकार भास्कर चंदावरकर



## निमित्त

शास्त्रीय संगीतातल्या अनेक वादकांनी वेळोवेळी चित्रपटांसाठी संगीतकार म्हणून काम केलं आहे. यात शिव-हरी (संतूरवादक शिवकुमार शर्मा आणि बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया), अली अकबर खान, पंडित रवीशंकर, झाकीर हुसेन, रघुनाथ सेठ, रामलाल यांची नावे ठळकपणे आठवतात. यांच्याशिवाय इतरही अनेक वादक आहेत ज्यांच्या रचनांची चित्रपट संगीतात फारशी चर्चा होत नाही. यातलं एक अत्यंत महत्त्वाचं नाव म्हणजे प्रसिद्ध सतारवादक पं. भास्कर चंदावरकर. त्यांचा जन्म १६ मार्च १९३६ रोजी पुण्यात झाला. त्यांचे भारतातल्या विविध लोकसंगीतांवर आधारित अनेक वाद्य अल्बम्स प्रकाशित झाले आहेत. त्यांनी चित्रपटांना संगीतही दिलं असल्याचं फार कमी लोकांना माहीत आहे. हे सर्व कलात्मक चित्रपट होते, ज्यांना भावपूर्ण आणि आशयानुरूप संगीत देऊन भास्कर चंदावरकर यांनी एक प्रतिभावंत संगीतकार म्हणून ठसा उमटवला.

मराठी रसिकांना भास्कर चंदावरकरांची सख्या रे घायाळ मी हरिणी, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, बांधले मी बांधले इंद्राचे तोरण बांधले यांसारखी गाणी पटकन आठवतात आणि आठवतं 'घाशीराम कोतवाल' या नाटकाचं आगळंवेगळं संगीत. चंदावरकरांनी फक्त या एकाच नाटकाचं संगीत केलं असतं तरी त्यांचं नाव अजरामर झालं असतं. इतकी अद्भूत नि विलक्षण कामगिरी त्यांनी नाटकाला संगीत देताना केलीय.

जगातल्या विविध संगीत प्रवाह नि प्रकारांचा त्यांचा गाढा अभ्यास आणि आधुनिक कलांचा प्रचंड व्यासंग होता. पंडित रवीशंकर, त्यांच्या पत्नी अन्नपूर्णा आणि पंडित उमाशंकर मिश्रा यांच्याकडून सतारवादनाचे धडे त्यांनी गिरवले. चित्रपट कला आणि संगीताचे ते शास्त्रशुद्ध मांडणी करणारे अभ्यासक तथा संशोधक होते. त्यांनी काही पाश्चात्य जाणकारांकडून जॅझ संगीताचंही शिक्षण घेतलं होतं. पाश्चात्य संगीत आणि भारतीय संगीत यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी यावर जगभर व्याख्यानेही दिली. त्यांनी संगीतात अनेक नवनवीन प्रयोग केले. त्यांनी केलेल्या नृत्य नाटिकांचं संगीतही खूप गाजलं.

घाशीरामशिवाय तीन पैशांचा तमाशा, गिरीबाला, ये रे ये रे पावसा, जेतेगिरी बेन चंदेरी, आषाढ का एक दिन या नाटकांनाही त्यांनी संगीत दिलं. त्याचप्रमाणे जपानी भाषेतलं 'मीवा' आणि जर्मन भाषेतलं 'नागमंडल' ही नाटकंही त्यांनी संगीतबद्ध केली. चंदावरकरांच्या अफलातून सांगितिक प्रतिभेचा अजून एक आविष्कार म्हणजे 'नक्षत्रांचे देणे' हा काव्य-संगीताचा कार्यक्रम. कविवर्य आरती प्रभू यांच्या कवितांवर आधारित हे रंगमंचीय सादरीकरण म्हणजे त्यांनी शब्द-संगीताला दिलेली अनमोल देणगी म्हटली जाते. त्यांनी 'स्वप्नकोष' हा बॅले, 'प्रतिमा' हे नृत्यनाट्य, 'वोल्गा ते गंगा', 'रंगविविधा' यांसारख्या रंगमंचीय सादरीकरणातून आपल्या प्रतिभेचा मनोज्ञ प्रत्यय रसिकांना आणून दिला. मराठी, हिंदी, मल्याळम, कन्नड भाषांमधले चित्रपट त्यांनी संगीतबद्ध केले.

पंडित भास्कर चंदावरकर हे मराठीतले अभिजात संगीतकार होते, पण त्यांची म्हणावी तशी दखल मराठी समाजाने घेतली नाही, असं खेदाने म्हणावं लागतं. चंदावरकर यांनी २६ जुलै २००९ रोजी अखेरचा श्वास घेतला. या अभिजात संगीतकाराच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**-प्रा.डॉ. प्रवीण घोडेस्वार**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# टू-व्हीलर चालवून मान, पाठ, कंबर दुखते? हे करा

टू-व्हीलर वापरणं जितकं सोयीचं तितकाच त्रासदेखील भरपूर होतो. विशेषतः आपल्यापैकी काहीजण स्कूटर किंवा बाईक अगदी दररोज चालवतात, त्यांना मान, पाठ आणि कंबरेच्या दुखण्याचा त्रास जाणवतो. टू-व्हीलरवर चुकीची बसण्याची पद्धत, खड्ड्यांमुळे शरीराला बसणारे हादरे, आणि शरीराच्या एका स्थितीत सतत राहणे यामुळे स्नायूंवर अतिरिक्त ताण येतो. या सगळ्या गोष्टी दुर्लक्षित केल्यास पुढे गंभीर शारीरिक समस्या निर्माण होऊ शकतात. फक्त काही मिनिटे दररोज योग्य पद्धतीने योगासने केली, तर ही दुखणी दूर होऊन शरीर सुदृढ राहते.



१. पवनमुक्तासन :- पवनमुक्तासन हे एक अतिशय उपयुक्त आणि सोपं योगासन आहे, जे विशेषतः कंबर आणि पाठदुखीपासून आराम मिळवा म्हणून केले जाते. हे आसन केल्याने कंबर आणि पाठीच्या स्नायूंना लवचिकता मिळते, शरीराचा व पाठीच्या मणक्याचा ताण कमी होतो. पाठीवर सरळ झोपा. पाय आणि हात बाजूला पसरवून ठेवा. दोन्ही पाय गुडघ्यात वाका आणि छातीकडे ओढा. हातांनी गुडघे घट्ट धरून छातीशी लावा. श्वास सोडत डोकं उचलून नाक गुडघ्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करा. या स्थितीत १५ ते ३० सेकंद रहा आणि नंतर परत पूर्व स्थितीत या. हे आसन दोन ते तीन वेळा करा.

२. भुजंगासन :- भुजंगासन हे आसन मुख्यतः पाठीच्या दुखण्यावर, कंबरदुखीवर आणि पोटाचे विकार दूर करण्यासाठी उपयोगी आहे. दररोज काही मिनिटं भुजंगासन केल्यास कंबरेचे स्नायूं मजबूत होतात व शरीराला लवचिकता, मानसिक शांतता आणि चांगली ऊर्जा मिळते. सर्वप्रथम पोटावर झोपा. दोन्ही पाय सरळ व जवळजवळ ठेवा. हात कोपरातून वाकवून छातीच्या दोन्ही बाजूला ठेवा. श्वास घेत हळूच डोकं, छाती आणि पोटाचा वरचा भाग वर उचला. कोपरे शरीराला जवळ ठेवा आणि नाभीपर्यंतच शरीर वर उचला. या स्थितीत १५ ते ३० सेकंद रहा, श्वास सोडत पुन्हा जमिनीवर या.

३. बालासन :- बालासन हे आसन पाठीच्या ताणावर, मानसिक थकव्यावर आणि शरीरांतील श्वसन यंत्रणेवर सकारात्मक परिणाम करतं. यासोबतच, पाठ, मान आणि खांद्यांच्या ताणावर आराम मिळतो. वज्रासनात बसा म्हणजेच गुडघे दुमडून बसा. नंतर हळूहळू वरचं शरीर पुढे झुकवा आणि कपाळ जमिनीवर टेकवा. हात सरळ पुढे पसरा किंवा पाठीमागे देखील ठेवू शकता. डोळे बंद करा, श्वासावर लक्ष द्या आणि शरीर सैल सोडा. या स्थितीत ३० सेकंद ते दोन मिनिटांपर्यंत राहा.

# मुळखानाव येथे महिलेस दुखापत करून दागिने चोरीचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील मुळखानाव येथे परप्रांतिय व्यक्तीने व्यवसायाने ब्युटी पार्लर असलेल्या महिलेच्या घरात प्रवेश केला व तिला दुखापत करून तिच्या अंगावरील दागिने चोरण्याचा प्रयत्न केल्या संदर्भात रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बिहार राज्यातील परिहारी अरारीच्यामधील गोपाळपुर वार्ड न.१५ येथील पारस कुमार सध्या मुळखानाव येथे राहत आहे. त्यांनी २४ जुलैला खानाव येथे ब्युटी पार्लरचा व्यवसाय करत असलेल्या ३२ वर्षीय महिला अस्मिता वैभव भोईर यांच्या घरात हॉलमध्ये प्रवेश करून तिला दुखापत करत तिच्या अंगावरील दागिने चोरी करण्याचा प्रयत्न केला, अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे महिला अस्मिता वैभव भोईर हिने दाखल केली आहे.

रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नोंद करण्यात आला असून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोसई श्रीराम रायभान पडवळ हे रेवदंडा पोलीस ठाणे इन्चार्ज सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले हे करत आहेत.

---

## निर्लेखित साहित्याच्या विक्रीबाबत आवाहन

**रायगड :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड या संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री जसे आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने करणे प्रस्तावित्त आहे. यामध्ये निर्लेखित झालेले यंत्रसामुग्री व उपकरणे इत्यादी साहित्याचा समावेश असून या निविदा प्रक्रियेकरीता लिफाफा पध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टी.नोंदणीधारक खरेदीदारांनी सिलबंद निविदा सादर कराव्यात, असे आवाहन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एन.एस.पुरकर यांनी केले आहे.

विक्री करावयाच्या वस्तू संस्थेतील संबंधीत विभागामध्ये दि. २५ जुलै ते दि.२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सुटीचे दिवस वगळून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त पहावयास मिळतील. याच कालावधी दरम्यान सादर करावयाच्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज रु.३००/-(अक्षरी रुपये तीनशे मात्र ) ना परतावा किंमतीत संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येईल.

सदर नमुन्यातील पूर्ण माहीती अचुकपणे भरलेली निविदा अर्जासोबत रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) अनामत रक्कम जमा करणे गरजेचे असेल सदर रक्कमेचा भरणा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड या नावाने डी.डी.च्या स्वरुपात करावा. इच्छुक जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदी दारांनी वर उल्लेख केलेल्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज डी.डी. सह (प्रपत्र अ व प्रपत्र ब करीता वेग्ळे स्वतंत्र लिफाफा द्यावा) २ ऑगस्ट २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळून सिलबंद लिफाप्यात कार्यालयात जमा करावा.

संपूर्ण निविदा प्रक्रीया रदद करण्याची किंवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. सदर सिलबंद निविदा ४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वा. संस्थेच्या प्राचार्याच्या कक्षात उघडण्यात येतील.

---

## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
Email : panvelcorporation@gmail.com

### जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिके मार्फत विविध प्रकारचे कार्यक्रम करण्यात येत असतना त्या अनुषंगाने सर्व कार्यक्रमांचे एकत्रित दर असावे या उद्देशाने विविध कार्यक्रम करणे जनजजागृती, अभियान, सादर करणे व विविध अनुषंगीक कार्यक्रम यांचे दर मागविण्यासाठी अंदाजपत्रक बनविण्याकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त कामाची सविस्तर माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ३५२/३६२/२०२५**
**दिनांक :- २५/०७/२०२५**

**सही /-**
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त (भांडार)**
**पनवेल महानगरपलिका**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत श्री. काशिनाथ सावळाराम दामणे, रा. अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांचे मालकी, ताबाकब्जा वहिवाटीची आहे. सदरहु मिळकतीबाबत हक्काचा पडताळा घेऊन तसा हक्क अहवाल (सर्च रिपोर्ट) देणेबाबत आमचे अशीलांनी आम्हांस सुचीत केले आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहित स्वतःच्या मालकी, वहिवाटीची असल्याबद्दलची खात्री व कागदपत्र मिळकतीचे मालकांनी आम्हांस दिलेली आहे. तरीही कोणाही व्यक्तिचा सदर मिळकतीत किंवा मिळकतीच्या एखाद्या भागात विरुध्द कब्जाने किंवा वारसा, गहाण, दान, विकी, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसेन्स, पोटगी, इजमेंट, एखादा अनोंदणीकृत दस्त किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास त्यांनी खालील सही करणार याचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन **पंधरा दिवसाच्या आत** आपले कागदपत्रासह खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.

वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास, एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे समजुन सदरहु मिळकतीबाबतचा योग्य तो हक्क अहवाल (सर्च रिपोर्ट) देण्याबाबत योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्यात येईल व मुदतीनंतर येणा-या हरकतीस आम्ही जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र | आकार | मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|
| अरिवली | १५/५/अ | ०-३३-२०<br>०-०४-२०<br>एकुण ०-३७-४० | ६-७५ | श्री. काशिनाथ सावळाराम दामणे |

सदरहु जाहिर नोटीस मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी श्री. काशिनाथ सावळाराम दामणे यांचे मालकी, ताबाकब्जा वहिवाटीचे लागवडीखालील सुमारे ०-२३-२० हे.आर. अधिक पो.ख. ०-०४-२० हे.आर. एकुण क्षेत्र ०-२७-४० हे. आर. इतके क्षेत्राबाबत आहे

**उरण**
**२५-०७-२०२५**

**सही/-**
**ॲड. रमाकांत पाटील**
**वकिल**

**ऑफीस** - ९ब, साईआकाश अपार्टमेंट,करंजा रोड, राजपाल नाका, डाके हॉस्पीटलजवळ उरण,ता. उरण, जि. रायगड

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - वांगणी तर्फे वाजे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ९० | ०-९६-३०<br>पो.ख. ०-१९-५०<br>एकूण १-१५-८० | १४.८७ | संजय शंकर म्हसकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २५/०७/२०२५.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**मो. क्र.: ९९३०३६९८६१**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे-माडभुवन ,तालुका-पनवेल,जि.रायगड येथील जमीन मिळकत हि १)श्री.बाळाराम सोमा वाघे व इतर यांच्या मालकीची ,ताबेकब्जातील, वापरातील व वहिवाटीतील त्यांच्या कायदेशीर हिश्श्याची असलेली खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशील हे कायम स्वरूपी नोंदणीकृत खरेदिखताने विकत घेत आहेत. सबब सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत . सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माडभुवन, ता-पनवेल, जि-रायगड**

| सर्वे. नंबर | क्षेत्र हे. आर.पॉ | सर्वे. नंबर | क्षेत्र हे. आर.पॉ |
|---|---|---|---|
| २/ई/११/ज/क/२७ | १-००-०० | २/ज/१३ | १-००-०० |
| २/ग/४५ | १-००-०० | २/ज/२ | १-००-०० |
| २/ज/११ | १-००-०० | २/ज/१ | १-००-०० |
| २/फ/११/ग/४१ | १-००-०० | २/म/११/इ/२० | १-००-०० |
| २/ग/४३ | १-००-०० | २/ग/४६ | १-००-०० |
| २/म/११/ज/६ | १-००-०० | २/ई/२९ | १-००-०० |

सदरहू शेतजमीन या मिळकतीमध्ये अन्यकोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क,विकासन करार,हितसंबंध,कुळ,वहिवाट,ताबा,कब्जा,इंजमेंट,साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत हि निर्वेध व बोजरहित आहेत व हरकत असलयास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदिखताचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशील हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

**ठिकाण**: पनवेल
**दिनांक**: २५/०७/२०२५

सही / **अँड.पल्लवी अमृत मानकर**
बी.कॉम.,एल.एल.एम.,डी.सी.एल.
कार्यालयीन पत्ता : शॉप नं.१,आकाशदीप बिल्डींग, ऑपो. कनक सरोवर, ठाणा नाका रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. **मो. ८८३०४४८२९१**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. संतोष तुकाराम वाढवणे** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : वशेणी (५५३३४४)**
(PU-ID : 16632297618), तालुका - उरण, जिल्हा - रायगड

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | भूधारण पध्दत | क्षेत्र (हे. आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १०१ | २ | १ | जि.क्षे.०.५१.१०<br>पो.ख.०.०३.३० | ११.५१ |
| | | एकूण क्षेत्रफळ | ०.५४.४० | |
| या एकुण क्षेत्रापैकी दुसरेपक्षी यांचे नावे असलेले क्षेत्र | | | | |
| | | खाते क्रमांक ९८९ | जि.क्षे.०.१७.००<br>पो.ख.०.००.०० | ३.८३ |
| | | एकूण क्षेत्रफळ | ०.१७.०० | |
| एकुण क्षेत्र ०.१७.०० गुंठयाचे खरेदीखत | | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०७/२०२५

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी. एच. एस.भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२,कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड-४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

---

### सार्वजनिक सूचना

लक्ष्मी ऑप्थॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या सूचनेद्वारे सर्व जनतेला कळवत आहे की ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२० पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यंतच्या आयपीडीच्या जुन्या वैद्यकीय नोंदी (एमएलसी, न्यायालयीन प्रकरणे आणि बालरोग प्रकरणे वगळता) खालील ठिकाणी नष्ट करण्यात येईल. कुडावे गांव, पळस्पे, पनवेल. ज्या रुग्णांना त्यांचे वैद्र्यकीय कागदपत्रे घ्यायची आहेत त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील पत्त्यावर संपर्क करावा. एमआरडी विभाग, लक्ष्मी ऑप्थॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, उरण रोड, जुने पनवेल येथील आम्ही एक महिन्यानंतर दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२० ओपीडी आणि ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ आयपीडी (एमएलसी, कोर्ट केसेस आणि पेडियाट्रिक्स केसेस वगळता) सर्व वैद्यकीय नोंदी नष्ट करू आणि त्या नंतर कुठल्याही पत्रव्यवहारला आम्ही जबाबदार राहणार नाही.

### PUBLIC NOTICE

Laxmi Ophthalmic Services Pvt Ltd through this notice inform all public that the old medical records of OPD from 01/04/2018 to 31/03/2020 and IPD from 01/04/2018 to 31/03/2019 (except MLC, court cases & Pediatrics cases) are to be discarded at the following locations. at Kudave Village, Palaspe, Panvel. Any patient who wants to collect their medical documents.may contact the MRD Department at Laxmi Ophthalmic Services Pvt Ltd, Old Panvel After one month of publication of this notice.we will destroy all medical records from 01/04/2018 to 31/03/2020 OPD and from 01/04/2018 to 31/03/2019 IPD (except MLC, court cases & Pediatrics cases) and will not be responsible for same.

---

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जुन २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | संतोष अशोक गोटे | जितेंद्र मारुती जाबेकर प्रियांका जितेंद्र जांबेकर | पवल१- ८०१५-२०२४ | २५/१०/२०२४ | सदनिका क. ०४, तळ मजला, बि.नं.१, सी विंग, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को. हौ. सो मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) |
| २ | ऐश्वर्या मंदारे रामनाखवा / मंदार नंदकुमार रामनाखवा | रविंद्र शंकर देशमुख / किर्ती रविंद्र देशमुख | पवल३-७३८९-२०२५ | २४/०३/२०२५ | सदनिका नं. डी १०२, पहिला मजला गंगाधाम बिल्डींग न.२. मौजे पालीदेवद (सुकापूर) |
| ३ | अकिता सिंह / संजू सिंह | सतीश पटवर्धन माळी/ पटवर्धन नामदेव माळी | पवल२-५९२१-२०२५ | २१/०३/२०२५ | सदनिका न.३०१, तिसरा मजला, ए विंग, निबेश्वर कुंज को हॉ. सो. मौजे पालीदेवद |
| ४ | सुनिता दिनेश चौरसिया / दिनेश हजारीलाल चौरसिया | नयना धनाजी पाटील / धनाजी काशिनाथ पाटील | पवल१-८८२४-२०२४ | ०४/१२/२०२४ | सदनिका न. १०३, पहिला मजला, लक्ष्मी निवास को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ५ | संकेत दिलीप डिंगरे | विराज विजयराजन नंबीयार | पवल३-६८७७- २०२५ | २१/०३/२०२५ | सदनिका नं. १०४, पहिला मजला, ए विंग, निंबेश्वर पार्वती को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ६ | शोभा सचिन चौरसिया | रणजित कुमार महतो | पवल२-८७२९-२०२३ | २३/०५/२०२३ | सदनिका न.१०३, पहिला मजला, बि.न.२, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को. हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | श्रीशचन्द्र शुक्ला /शिल्पी शुक्ला | संगिता मिलिंद गोरे / मिलीद दत्तात्रेय गोरे | पवल१-४०४०-२०२५ | २६/०५/२०२५ | सदनिका नं.बी १. तळ मजला, बि.नं.६, साक्षी पार्क २. को.हौ. सो मौजे शिलोत्तर रायूचर (सुकापूर) |
| ८ | दिपक बाळाराम खडतर / ज्योती दिपक खडतर | मोहन मनोहर पै /अनुजा मोहन पै | पवल१-३८५५-२०२५ | २०/०५/२०२५ | सदनिका न. १०३, पहिला मजला बी विंग, निबेश्वर संस्कृती को हौ सो मौजे पालीदेवद (सुकापूर) |
| ९ | नन्सी अँथनी दास | शांताम्मा पिटर | पवल१-४५५९-२०२५ | १६/०६/२०२५ | सदनिका नं.२०३, दुसरा मजला, बि.नं.१, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) |
| १० | अभिषेक पुरुषोतम कानकिरड | विजय हिरालाल शर्मा | पवल-३-४५२८-२०२३ | १४/०३/२०२३ | सदनिका न. ३०१, तिसरा मजला,ए विंग, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. सुकापूर) |
| ११ | प्रथमेश राजकुमार कडवे | मनीष डी. खोत /पल्लवी एम. खोत | पावल३-७५७२-२०२५ | २६/०३/२०२५ | सदनिका न.१०३, पहिला मजला, ए विंग, निबेश्वर पार्वती को हौ. सो. मौजे पालीदेवद (सुकापूर) |
| १२ | मोहन रघुनाथ दळवी | गणेश भरत कांबळी | पवल३-१२३९८-२०२५ | २०/०५/२०२५ | सदनिका नं.२०४. दूसरा मजला, सी विंग, साई ईन्क्लेव्ह को हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

---

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जुलै २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | सध्या शैलेश गांगर्डे | शैलेश सर्जेराव गांगर्डे | पवल२-५७४७-२०२० | २५/०८/२०२० | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, ईलाईट होम्स, मौजे पालीदेवद |
| २ | उदयकुमार श्रीनिवास कीर्ती | समीर सुरेश चितळे / प्रियांका समीर चितळे | पवल१-१९५६-२०२४ | १८/०३/२०२४ | सदनिका क्र.१, तळ मजला, बि.नं. २, डी विंग, स्वानंदभूमी कॉम्प्लेक्स, स्वराज को.हौ. सो. मौजे पालीदेवद |
| ३ | बिनोद कुलदीप यादव / मनिषा बिनोद यादव | लिला नारायण म्हसकर / कल्पना नरेश ठाकूर | पवल२-२०२२९-२०२३ | १७/११/२०२३ | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, जनलक्ष्मी को हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ४ | जोसेफ राजकुमार तेलंग / गेब्रीयल राजकुमार तेलंग | अजगर अली इब्राहीम सय्यद हकीम /लतीफाबी अजगरअली सय्यद | पवल१-८३१२-२०२४ | १२/११/२०२४ | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, ए विंग, साई ईन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ५ | कृष्णा धोंडू भोपी | सुनिता विजय तायडे | पवल२-१८७९०-२०२४ | २७/०९/२०२४ | सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, ए विंग, युनिटी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ६ | विनायक प्रकाश तावडे / मोनिका विनायक तावडे | अनिल भाईदास वाडिले | पवल२-१६८७-२०२४ | २९/०१/२०२४ | सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, सी विंग, निबेश्वर संस्कृती को.हौ. सो., मौजे पालीदेवद. |
| ७ | मुन्ना निलकंठ यादव / गुडिया मुन्ना यादव | विनोद बाळकृष्ण गोसावी / वैशाली विनोद गोसावी | पवल१-३८५९-२०२५ | २०/०५/२०२५ | सदनिका क्र. ०९, पहिला मजला, सी ४, तपोवन बिल्डींग को.हौ. सो., मौजे शिलोतर रायचूर |
| ८ | सुसन राजू | अमान यासीन वानू | पवल२-११२००-२०२४ | ०३/०६/२०२४ | सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, सी विंग, श्री युनिटी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) |
| ९ | सुसन राजू | मे. यूनिटी बिल्डर्स तर्फे भागीदार प्रेषित ॲलन चांदेकर | पवल२-११०१४-२०२४ | ३०/०५/२०२४ | सदनिका क्र. ४०३, चौथा मजला, सी विंग, श्री युनिटी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) |
| १० | आकाश श्रीरंग नवले | संतोष विजय चव्हाण / शुभागी संतोष चव्हाण | पवल१-८२२७-२०२४ | ०८/११/२०२४ | सदनिका क्र. ३०४, तिसरा मजला, ए विंग, बि.नं.५, साई ईन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोतर रायचूर (सुकापूर) |
| ११ | विवेक विष्णू कदम /अनिता विवेक कदम | प्रमोद गजानन दरेकर | पवल१-३९५६-२०२५ | २२/०५/२०२५ | सदनिका क्र. १५, पहिला मजला, बि.नं. जी -२, वसुंधरा को.हौ.सो. युगांतक हॉसिंग कॉम्प्लेक्स, मौजे शिलोतर रायचूर (सुकापूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# वाशीतील रस्त्यांवर मोठे खड्डे

## वाहनचालकांचे हाल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी सेक्टर-१७ जवळील अरेंजा कॉर्नर सिग्नल हा आधीपासूनच अपघातप्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. त्यातच सध्या तुर्भेकडून सानपाड्याकडे जाणाऱ्या मार्गाच्या सिग्नल जवळील रस्त्याच्या कडेला भले मोठे खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांचे हाल अधिकच वाढले आहेत. विशेषतः कार, दुचाकी आणि रिक्षासारखी लहान वाहने या खड्ड्यांमध्ये अडकून अपघाताचा धोका वाढत आहे.

पाम बीच रोडला जोडणाऱ्या या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर रहदारी असून, सकाळी व संध्याकाळी कामावर जाणाऱ्या नागरिकांसाठी तसेच एपीएमसीत ये-जा करणाऱ्या अवजड वाहनांसाठी हा रस्ता मुख्य मार्ग आहे, मात्र सध्या रस्त्यांचाकडेला पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना गाडी



चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे रात्रीच्या वेळी ते अजून धोकादायक बनतात. अनेक वेळा लहान वाहने या खड्ड्यांत अडकतात, तर काहीवेळा चाकांची झडप तुटण्याचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे अरेंजा कॉर्नर परिसरातील खड्डे पाहता, हे ठिकाण केवळ त्रासदायक न राहता धोकादायक बनले आहे. स्थानिक प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी विनंती वाहन चालकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नवी मुंबईसारख्या नियोजित शहरातील 'स्मार्ट रस्ते' हे केवळ कागदावरच राहिल्याची टीकाही नागरिकांकडून होत आहे.

**अरेंजा सिग्नलजवळ सतत अपघाताची भीती वाटते. खड्ड्यांमुळे गाडी सांभाळावी की समोरचा ट्रॅफिक हेच समजत नाही. वर्षानुवर्षं हा सिग्नल अपघातप्रवण म्हणून ओळखला जातो. पण प्रशासन काहीही शिकत नाही. नागरिकांच्या जीवाशी खेळ होतो आहे.**
**-सुनील कदम, वाहनचालक**

**सहाय्यक अभियंत्यांना याबाबत सूचना देऊन रस्त्याची पाहणी करण्यात येईल आणि त्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.**
**-सागर मोरे,**
**विभाग अधिकारी, तुर्भे**

# प्रगतीशील पनवेल लघूपट स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी मुदतवाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून प्रगतीशील पनवेल ही भव्य दिव्य अशी लघूपट स्पर्धा (शॉर्टफिल्म) महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात आली आहे. या लघूपट स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. स्पर्धेकरिता नाव नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ३१ ऑगस्ट पर्यंत आता स्पर्धकांसाठी नाव नोंदणी करता येणार आहे. स्पर्धकांनी ईमेलद्वारे नाव नोंदणी करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

विकसनशील विकासात्मक प्रगतीशील अशी पनवेल महानगरपालिकेची वाटचाल सुरू आहे. येत्या १ ऑक्टोबरपासुन पनवेल मनपा आपल्या दशकपूर्ती वर्षात पदार्पण करीत आहे. मनपाने गत नऊ वर्षांच्या कालावधीत विविध विकासात्मक कामे केलेली आहे. या अनुषंगाने ही लघूपट स्पर्धा जाहिर करण्यात आली आहे.

**अटी शर्ती**



ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. लघुपटाचा कालावधी दहा ते पंधरा मिनिटे एवढाच असेल. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील लघुपट पात्र असतील. मात्र 'प्रगतीशील पनवेल' हा विषय केंद्रभागी असणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वरती नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी नंतर संबंधितांना स्पर्धेच्या सविस्तर अटी शर्ती बाबत माहिती दिली जाईल.

**भव्य पारितोषिके**

स्पर्धेसाठी एकुण २० पारितोषिके देण्यात येणार असून त्यांची रोख रक्कम ३ लाख ७५ हजार एवढी आहे. यात सर्वोकृष्ट लघूपटास १ लाख रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह असे पारितोषिक असणार आहे. तर द्वितीय लघूपटास ७५ हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह, तृतीय लघूपटास ५० हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह व उत्तेजनार्थ २ लघूपटास प्रत्येकी २५ हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या शिवाय ५ लघूपटांना प्रत्येकी १० हजार तर १० लघूपटांना प्रत्येकी स्पर्धेसाठी ५ हजार विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय दशकपूर्तीनिमित्त दहा पारितोषिके असणार आहेत.

**नोंदणी आवश्यक**

लघूपट स्पर्धेसाठी ३१ ऑगस्ट पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वर तसेच मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर ९८९२१०८३६५ या क्रमांकावर दुपारी दोन ते चार या वेळेतच संपर्क साधावा. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# नवी मुंबईतील गृहनिर्माण संस्था, वसाहती, गल्ल्यांमध्ये स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

दैनंदिन सफाई करण्यात येत असलेल्या जागांव्यतिरिक्त 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियानांतर्गत दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष दिले जात असून आज आठही विभागात गृहनिर्माण संस्था, वसाहती व प्रामुख्याने त्यामागील गल्ल्यांमध्ये सफाईची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या अंतर्गत नेरूळ विभागात से.२५ येथील सफल पार्क सोसायटी याठिकाणी अंतर्गत परिसर व पाठीमागील गल्ल्या यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे वाशी विभागातही नाखवा चौक वाशी गाव येथील वसाहतींचा परिसर आणि ग्रेन मर्चंट सोसायटी से.१७ वाशी परिसर व बॅकलेन या ठिकाणी सफाई मोहीम राबविण्यात आली.

तुर्भे विभागात मिलीनिअम टॉवर, से.९ सानपाडा आणि प्रभू आशिष सोसायटी से.२६ याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कोपरखैरणे विभागातील सोसायटी व रहिवासी भागातही सफाई करण्यात आली.



घणसोली विभागात से.६ प्रोग्रेसिव्ह सोसायटी परिसरात व बॅकलेनमध्ये सखोल स्वच्छता करण्यात आली. ऐरोली विभागातही अय्यप्पा मंदिराशेजारी से.१४ परिसरातील सोसायट्यांच्या भागात व मागील गल्ल्यांमध्ये सफाई मोहीम राबविण्यात आली.

सर्व ठिकाणच्या मोहीमांमध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता मित्र व स्वच्छता सखी यांच्या समवेत स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. आपण आपल्या परिसराचे व शहराचेही देणे लागतो या भावनेतून नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या मोहीमांमध्ये सहभाग घेतला. यावेळी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे उघड्यावर कचरा टाकू नये, कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करावे व वेगवेगळा ठेवलेला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतही वेगवेगळा द्यावा अशाप्रकारे सोसायटी वसाहतीमधील नागरिकांशी सुसंवाद साधून जनजागृती करण्यात आली.

बेलापूर विभागात १२ व्यावसायिक व नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता करीत असल्याचे निर्देशनास आल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली. 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलैपासून दररोज स्वच्छता व आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांनी ध्येय समोर ठेवून अभ्यास करावा -अरुणशेठ भगत









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय समोर ठेवून चांगला अभ्यास करावा, असा सल्ला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देयाचे काम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. त्यानुसार मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही वह्या वाटप उपक्रम सुरू केला असून नावडे, घोटगाव, तळोजे मजकूर आणि कोयनावेळे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या वह्यांचे वाटप भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजपनेते खालापूर तालुका संपर्क प्रमुख नेते प्रल्हाद केणी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांच्यासह माजी सरपंच संतोष पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, बूथ अध्यक्ष अशोक पाटील, नितेश पाटील, विनोद पाटील, पनवेल तालुका उत्तर मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष आशिष कडू, पवन भोईर, रवींद्र खानावकर, राम खानावकर, रामबुवा खुटारकर, राजेश खानावकर, विशाल खानावकर, राम म्हात्रे, प्रितम म्हात्रे, राजेश पाटील, संतोष पाटील, महेंद्र पाटील, प्रल्हाद पाटील, कृष्णा जाधव, गणेश पाटील, हरीदास पाटील, आशिष कडू, गणेश पाटील, शुभम खानावकर, आनंद सोनवणे, संकेत वगरे, सागर भोईर, प्रथमेश खानावकर, स्वराज खानावकर, विनेश कदम, रमेश कदम, भूपेश चव्हाण, सुशांत कदम, सुनील कदम, मंदार कदम, निखिल कदम, भरत दमानिया, रक्षित पाटील, भूषण गाडे, मुख्याध्यापक मनिषा कोतवाल यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# चालत्या कारच्या बोनेटवर तरुणीचे नृत्य

## व्हिडीओ व्हायरल; कारचालकावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ३४मधील प्रशांत कॉर्नरसमोरील रस्त्यावरून जाणाऱ्या मर्सिडीज कारच्या बोनेटवर तरुणीचा नृत्य करताना व्हिडिओ तयार करून तो व्हायरल केल्याचे लक्षात येताच वाहतूक पोलिसांनी मर्सिडीज कार मालक आई वडिलांविरोधात गंभीर गुन्हा दाखल केला आहे.



खारघर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संजय जनार्दन साळवी यांनी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. अल्पेश आजम शेख आणि रफिक सुल्डे यांनी त्यांच्या ताब्यातील मर्सिडीज कार प्रशांत स्वीट कॉर्नर समोरील रस्त्यावरून घेऊन जाताना तरुणीला चालू गाडीच्या बोनेटवर उभी करून नृत्य करायला लावले. हे सगळे प्रताप खारघर वाहतूक पोलिसांच्या लक्षात येताच त्यांनी गाडी मालकाची चौकशी केली असता त्यांच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नसल्याचे उघडकीस आले.

पोलिसांनी अधिक चौकशी केली असता गाडीवर एल आकाराचे चालक शिकत असल्याचे सूचना चिन्हही लावले नसल्याचे निर्दशनास आले. शेवटी वाहतूक पोलिसांच्या तक्रारीवरून खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# भाजप नेते सचिन तांडेल यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भाजपचे वासांबे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष तथा माजी सरपंच सचिन तांडेल यांचा वाढदिवस १८ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात व थाटामाटात व विविध सामाजिक समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भाजपचे वासांबे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल यांच्या वाढदिवसानिमित्त रसायनी परिसरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच पावसाळी छत्र्यांचे वाटप या वेळी करण्यात आले. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मान्यवरांनी गर्दी केली होती.

या वेळी माजी सरपंच कृष्णा पारंगे, सरपंच प्रतिप पाटील, उपसरपंच दिपक कांबळे, ग्रामपंचायत सदस्य आकाश जुईकर, प्रवीण जांभळे, दिलीप कर्णक, सागर सुखदरे आदी उपस्थित होते.



# फेडरेशनच्या अध्यक्षपदी चौधरी, सचिवपदी म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई को. ऑप हौसिंग फेडरेशन लि. या सहकारी संस्थेच्या निवडून आलेल्या नवनियुक्त व्यवस्थापक समिती सदस्यांमधून अध्यक्ष, खजिनदार व सचिव या पदांची निवड करण्यात आली. नवी मुंबई फेडरेशनच्या अध्यक्षपदी सुनील चौधरी तर सचिवपदी भास्कर म्हात्रे तसेच खजिनदारपदी पांडुरंग क्षेत्रमाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संचालकपदी छाया म्हात्रे व रश्मी सकपाळ महिलांची संचालकपदी निवड करण्यात आली आहे. फेडरेशनच्या २७ वर्षांच्या कार्यकाळात या वेळी पहिल्यांदाच महिलांची निवड करण्यात आली.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेशानुसार या संस्थेच्या पदधिकाऱ्यांची निवडणूक गुरुवारी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.



नवी मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना मार्गदर्शन करणे व त्यांना भेडसावत असलेल्या समस्या सोडवण्यात हौसिंग फेडरेशन नेहमीच तत्पर राहील. तसेच सध्या नवी मुंबईत पुनर्विकासाचे वारे वाहत आहेत. त्याबाबत गृहनिर्माण संस्थांना जी मदत लागेल ती फेडरेशनतर्फे दिली जाईल. कोणतेही राजकारण न आणता गृहनिर्माण संस्थांच्या समस्या सोडवू असे अध्यक्ष सुनिल चौधरी यांनी सांगितले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सहकार भारतीचे अध्यक्ष प्रमोद जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : बातमीदार**

श्री.रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था आवरे, व ए. एस सी कॉलेज बी एस सी बॅच १९९२ च्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे, गोवठणे, पाले, पाणदिवे, सारडे वशेणी, पुनाडे, पुनाडे वाडी, कडापे या दहा गाव परिसरातल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वह्या वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी ए. एस. सी कॉलेज बी. एस. सी बॅच १९९२ व श्री रामदास गवत्या गावंड सामाजिक संस्थेचे पदाधिकारी नितीन रामदास गावंड (आई फार्मा व आई मेडिकल मालक, पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन अध्यक्ष), अॅड.राजेश ठाकूर नेरे (थेरा रिसॉर्ट चे मालक), रामलाल ठाकूर पुनाडे (दिपक फर्टीलीझर्स), संजय म्हात्रे, बामन डोंगरी (बी पी सी एल, मुंबई), सदाशिव पाटील पुनाडे (सलोनी ऑरगॅनिक केमिकॅल्स), हसुराम म्हात्रे वशेणी (डीएव्हीचे सिनियर अकाउंटंट) या सर्व सहकाऱ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षक वर्गांनी चांगलं मोलाचे सहकार्य केले. तसेच प्रत्यक्ष कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप रामदास गावंड, साईनाथ रामदास गावंड, सदाशिव पाटील, राजेश कोंडिलकर, गणेश गावंड, अनिल गावंड आदींनी विशेष मेहनत घेतली. या वेळी शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग उपस्थित होते.

# भविष्याचा वेध घेऊन शिक्षण घ्या

## ◆ भाजप नेत्या चित्रा पाटील यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**पाली : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी भविष्यातील रोजगाराच्या संधीचा अचूक वेध घेऊन शिक्षण घेतले पाहिजे, असे आवाहन भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील यांनी केले. त्या अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात बोलत होत्या.

भारतीय जनता पक्ष आणि युवा मोर्चा यांच्या वतीने पेझारी येथे इयत्ता दहावी, बारावी व शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शुक्रवारी (दि. २५) झाला. या सोहळ्यास विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.



या वेळी भाजप नेत्या चित्रा पाटील म्हणाल्या की, रायगड जिल्हा तिसऱ्या मुंबईच्या दिशेने झेपावत आहे, नवी मुंबई विमानतळाच्या निर्माणानंतर रोजगार व नोकरीचे मोठे दालन खुले होणार आहे. शिवाय नवनवीन उद्योग व प्रकल्प रायगड जिल्ह्यात विस्तारत असताना विद्यार्थ्यांनी मन लावून, एकाग्रतेने अचूक शिक्षण व डिग्री घेण्याकडे लक्ष केंद्रित करावे. त्या पुढे म्हणाल्या की, कर्तृत्वाची पुढे जाण्याची पहिली पायरी इयत्ता दहावी व बारावी असते. मेहनत, सतत अभ्यास, सराव व सचोटी यामुळे विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात. कला, विज्ञान व कॉमर्समध्ये पुढे जायचे असते, पण योग्य करिअर मार्गदर्शन नसल्याने विद्यार्थी संधीपासून दूर राहतात. रायगड तिसऱ्या मुंबईकडे वळतोय. आंतरराष्ट्रीय विमानतळ येतेय. त्यामुळे कोणते शिक्षण गरजेचे आहे हे ओळखून पावले टाकावीत. इतके उच्चशिक्षित व्हा की, नव्या उद्योग, प्रकल्पात आपल्याला हक्काची नोकरी मिळाली पाहिजे. आपण छातीठोकपणे सांगितले पाहिजे की, होय आमच्यात गुणवत्ता आहे, ही नोकरी माझीच आहे, परप्रांतीय नोकरदारवर्गाला या संधी न मिळता स्थानिक भूमिपुत्रांना या नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. मुलींनीही इतके उच्चशिक्षण घ्यावे की, त्याच्या जोरावर त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व सधन होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत. येणारा भविष्यकाळ तुमचा आहे हे ओळखून करिअर घडविण्याकडे लक्ष केंद्रित करा, आम्ही कायम आपल्या सोबत आहोत, असेही चित्रा पाटील यांनी आश्वस्त केले.

या वेळी सवाई पाटील यांनीही विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदशन केले. कार्यक्रमास भाजप नेते अ‍ॅड. आस्वाद पाटील, उपाध्यक्ष सवाई पाटील, प्रियदर्शनी पाटील, मंजुषा कुद्रमोती, सरपंच सुमन पाटील, चेतन पाटील, रोशन भगत, अशोक वारगे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# ठग प्रसन्न पुलेकरला २८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

### कोट्यवधींचे फसवणूक प्रकरण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरासह ग्रामीण भागातील जनतेस कमीत कमी एक लाख रुपये गुंतवल्यास प्रत्येक महिन्यास १० हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची गुणवणूक करणारा व तद्नंतर पैसे देण्यास नकार देणारा प्रसन्न पुलेकर याला मुरूड पोलिसांनी काही दिवसांपूर्वी अटक केली होती. त्याला न्यायालयात सुरुवातीला हजर केले असता सर्वप्रथम पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्यानंतर त्याला पुन्हा न्यायालयात हजर केल्यावर २८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

मुख्य तक्रारदार महेश भगत यांनी व त्यांच्यासह १३६ जणांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवली होती. तक्रार दाखल झाल्यानंतर आतापर्यंत सुमारे किमान आठ कोटी एक लाख २५ हजार रुपये फसवणूक



झाल्याबाबत मुरुड पोलिस ठाण्यात अनेकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर या फसवणूक रकमेतसुद्धा वाढ झाली असून अनेक तक्रारदार आता समोर येत आहेत.

मुरुड पोलीस या फसवणूक प्रकरणाची कसून चौकशी करीत आहेत. प्रसन्न पुलेकर लोकांचे पैसे गोळा केल्यावर ते कोठे जमा करावयाचा? या प्रकरणात आणखी कोणाकोणाला त्याने पैसे दिले? पुलेकर याचे आणखी कोण साथीदार आहेत? अशी विविध प्रकरणे शोधून काढण्यासाठी पोलीस सखोल तपास करीत आहेत. पुलेकरच्या साथीदारांना शोधून काढण्यासाठी आरोपीला पोलीस कोठडी आवश्यक असल्याने तपास जलद गतीने सुरू आहे.

मुरुड पोलिस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास सुरू असून प्रत्येक बाब तपासली जात आहे. कोणतीही बँक नसताना बँकेप्रमाणे आर्थिक व्यवहार करणे हा कायदेशीर गुन्हा असून या कलमाचेसुद्धा या केसमध्ये समायोजन करण्यात आले आहे. फसवणूक; त्याचबरोबर अन्य कलमे लावण्यात आली आहेत. सध्या प्राप्त तक्रारीनुसार आठ कोटी रुपये फसवणूक रक्कम असली तरी सध्या अनेक तक्रारी प्राप्त होत झाल्याने हा आकडा वाढत आहे.

# खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पारंपरिक, सांस्कृतिक कार्यक्रम; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीने कारिवणे गावात महिलांसाठी पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे व मुलींसाठी स्पर्धांचे आयोजन करून समाजप्रबोधन व ग्रामएकतेचे उदाहरण दिले.

या कार्यक्रमात कारिवणे गावातील महिलांनी पारंपरिक पोशाखात विविध नृत्य सादर केली. लहान मुलींसाठी घेतलेल्या स्पर्धांमध्ये बालकलाकारांनी आपले कौशल्य सादर करत टाळ्यांचा कडकडाट मिळवला. कार्यक्रमाला ग्रामस्थांसह महिलावर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्याचप्रमाणे गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विकासकामांसोबत सांस्कृतिक मूल्य जपण्याचा एकत्रित प्रयत्न झाला.



कार्यक्रमास उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर यांनी सांगितले की, विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून खासदार सुनील तटकरेसाहेबांच्या प्रयत्नांतून वाशी ग्रामपंचायतीला १६ ते १७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तटकरेसाहेबांचे या ग्रामपंचायतीवर विशेष प्रेम आहे. निधीच्या साहाय्याने गावात रस्ते, पाणी, वीज, शाळा अशा मूलभूत सुविधांचा विस्तार झाला आहे. या ग्रामपंचायतीच्या सरपंच वंदना वारंगडे, उपसरपंच अरविंद मगर, ग्रामसेवक नेहमीचे परिसराच्या विकासासाठी पाठपुरावा करतात, परंतु येथील महिलांनी खासदार तटकरेसाहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने येथील एक आगळावेगळा उपक्रम राबवून गावाला एकत्र आणले व गावात आनंद साजरा करण्यात आला हे कौतुकास्पद आहे.

उपसरपंच अरविंद मगर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विकासाचा पाया सक्षम नेतृत्वावर अवलंबून असतो. सुरेश मगर यांच्या मार्गदर्शनामुळे ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी कार्य होत आहे आणि या कार्यक्रमातून गावातील महिलांनी एकत्र येऊन एकात्मतेचा संदेश दिला आहे.

कार्यक्रमास सरपंच वंदना वारगुडे, उपसरपंच अरविंद मगर, सदस्य पांडुरंग हबीर, हरिश्चंद्र मोरे, मनाली मगर, दिपाली धामसे, समिधा मगत, ग्रामसेवक दत्तात्रय सावंत, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत भगत, शाहिर अनंता मगर, सोनू शिद, मंगेश पुजारी, जानू वारगुडे, जनार्दन ढेंबे, भागोजी ढुमणे, तानाजी ढुमणे, सतीश शिगवण, हिरू धामसे, परेश मगर, प्रवीण मगर, ग्रामपंचायतीचे कर्मचारी सहदेव बर्डे उपस्थित होते.

# रोह्यातून आयएस, आयपीएस अधिकारी होण्यासाठी प्रयत्नशील -अनिकेत तटकरे

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातून आयपीएस अधिकारी निर्माण झाले पाहिजेत हे आपले नेते खासदार सुनील तटकरेसाहेबांचे स्वप्न आहे. यासाठी मी, नामदार अदितीताई तटकरे वरदाई ट्रस्ट व युनिक अकॅडमीच्या माध्यमातून रोह्यात स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन शिबिर सुरु करणार आहोत. या शिबिराच्या माध्यमातून विध्यार्थी वर्गाला वेगवेगळे प्रशिक्षण दिले जाणार आहे, जेणेकरून पुढच्या कालखंडात आपल्या रोहा तालुक्यातून आयपीएस, आयएस, एसपी दर्जाचे अधिकारी होतील यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, अशी ग्वाही माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी दिली.

खासदार सुनील तटकरे यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त तसेच ज्येष्ठ नेते स्व. जनार्दन कोळी यांच्या ७८व्या जयंतीनिमित्त माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते रजिप शाळा पिगोंडे, गीता द. तटकरे माध्यमिक शाळा व अंगणवाडी वेलशेत आंबेघर (नागोठणे) येथील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, व्हाईट बोर्ड, डस्टबिन वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम पिगोंडे ग्रामपंचायत सभागृहात शुक्रवारी (दि. २४) झाला. त्या वेळी अनिकेत तटकरे बोलत होते.

या कार्यक्रमाला नागोठणे सहकारी भातगिरणी संस्थेचे अध्यक्ष सदानंद गायकर, स्व. जनार्दन कोळी यांचे पुत्र पिगोंडे सरपंच संतोष कोळी, चंद्रकांत कोळी, नंदकुमार कोळी, ज्येष्ठ नेते मधुकर ठमके, सुधाकर पारंगे, युवा नेते राकेश शिंदे, सचिन कळसकर, राजेंद्र शिंदे, निवास पवार, रोशन पारंगे, अमित जांबेकर, रामकृष्ण देवरे, सखाराम घासे, मनोज ताडकर, यादव माळी, दीपक माळी, विजय पारंगे, संतोष ताडकर, जे.डी. पाटील, मारुती पारंगे, हेमंत शहासने, ग्रामपंचायत अधिकारी विजय अहिरे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

अनिकेत तटकरे पुढे म्हणाले की, स्व. जनार्दन कोळी आणि परिवाराशी आमचे तीन पिढ्यांचे नातेसंबंध आहेत. खासदार तटकरेसाहेबांच्या कठीण काळातदेखील नागोठणे विभागातील ज्येष्ठ नेते त्यांच्यासोबत राहिले. तटकरेसाहेबांसोबतचे ज्येष्ठ नेते व माझ्या सोबतचे तरुण कार्यकर्ते यांच्यामुळे आजही नागोठणे हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. ज्येष्ठ नेत्यांनी त्यावेळच्या काळात शिक्षणाला महत्व दिले म्हणून आज शिक्षण क्षेत्रात प्रगती झाल्याचे आपणास पहावयास मिळत आहे.

रिलायन्स कंपनीने त्यांच्या स्कूलमध्ये फक्त कामगारांच्या मुलांना प्रवेश न देता विभागातील जे विद्यार्थी शिक्षण घेण्यास पात्र आहेत त्या सर्वांना प्रवेश दिला पाहिजे, असे शेवटी अनिकेत तटकरे म्हणाले. ज्येष्ठ नेते सदानंद गायकर यांनीदेखील विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच संतोष कोळी यांनी, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पुंडलिक ताडकर यांनी व्यक्त केले.






# उतेखोल केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पंचायत समिती अंतर्गत उतेखोल केंद्रांची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद नुकतीच रायगड जिल्हा परिषद शाळा उतेखोल येथे अभ्यासपूर्ण वातावरणात व केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

परिषदेच्या सुरवातीस सरस्वतीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिक्षकांनी सुमधुर आवाजात समूहगीत गायन करुन शिक्षण परिषदेची छान सुरुवात केली. विकास कॉलनी शाळेच्या शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे यांनी इयत्ता पहिलीचा बदललेला अभ्यासक्रम आणि नावीन्यपूर्ण उपक्रम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. बामणोली शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका वैशाली पवार यांनी गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यासंदर्भात प्रत्यक्ष माहिती पुस्तिकेसह सविस्तर देऊन मार्गदर्शन केले. उतेखोलवाडी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका स्नेहल उतेकर यांनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती, मंथन, आरटीएस स्पर्धा परीक्षा या विषयावर सविस्तर उदाहरण दाखल्यासह सविस्तर अभ्यासपूर्ण माहिती दिली व मार्गदर्शन केले. उतेखोल केंद्राचे प्रमुख शंकर शिंदे यांनी नवभारत साक्षरता, शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा, पायाभूत परीक्षा, विद्यार्थी सुरक्षा, निपुण भारत अभियान, विद्यार्थी अध्ययन स्तर निश्चिती, आपत्कालीन परिस्थितीत व्यवस्थापन, स्कॉपसंदर्भात माहिती, घरघर संविधान, शालेय भौतिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तक, विद्यार्थी प्रमोशन, आदिवासी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आदी प्रशासकीय विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

शिक्षण परिषद यशस्वी होण्यासाठी केंद्रप्रमुख शंकर शिंदे सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य व योगदान मिळाले. उपस्थितांचे आभार खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे मुख्याध्यापक रमेश उभारे यांनी मानले. राष्ट्रगीताने परिषदेची सांगता करण्यात आली.



# ‘उद्योजकता, स्टार्टअप आणि इनक्युबेशन’वर ऑनलाईन कार्यशाळा



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन ए इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली इनक्युबेशन कमिटी आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता, स्टार्टअप आणि इनक्युबेशन सेंटर या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील स्कूल ऑफ लाईफ सायन्सचे संचालक प्रा. भूषण चौधरी यांनी विद्योर्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. चौधरी यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी जागृती निर्माण करताना शासकीय योजना, कौशल्यविकास, नवोपक्रमाची संस्कृती आणि नेटवर्किंगचे महत्त्व यावर सखोल चर्चा केली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप्सच्या संधींबाबत माहिती दिली आणि भविष्यातील करिअरमध्ये इनोव्हेटिव्ह विचार कसा महत्त्वाचा ठरतो हे उदाहरणांसह समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन इनक्युबेशन कमिटी प्रमुख प्रा. जावेद खान आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रमुख रहीम बागवान यांनी केले. या उपक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापकवर्गाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## शिष्यवृत्ती परीक्षेत आदिती पवारचे यश

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५मध्ये नांदगावच्या आदिती राजेंद्र पवार हीने ग्रामीण सर्वसाधारण शिष्यवृत्ती गटात मोठे यश मिळवले आहे. फेब्रुवारी २०२५मध्ये ही परीक्षा घेण्यात आली होती.तिचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे.



नांदगावच्या रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा नं.१ची विद्यार्थिनी आदितीने या परीक्षेत एकूण ३०० गुणांपैकी २०४ गुण (६८% गुण) प्राप्त करून शिष्यवृत्ती मिळवली आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापिका संगीता खानावकर, शिक्षक रुपेश बांद्रे, हेमंत नांदगावकर, राठोड यांच्यासह नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सेजल घुमकर व सर्व सदस्य, नांदगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत तसेच ग्रामस्थांनी आदितीचे व तिच्या आई-वडिलांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# युगांतर एक्स नवभारताच्या डिजिटल युगाची क्रांती!

## ◆ डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरची यशोगाथा

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटर (डीएफआयआयइ) अंतर्गत सुरू झालेल्या युगांतर एक्स या स्टार्टअपने भारतात डिजिटल परिवर्तनाची चळवळ उभारण्याचे व्रत घेतला आहे.

हा उपक्रम कुलगुरु कर्नल डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.ए.पी.शेष, इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. संजय नलबलवार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे यांच्या प्रेरणादायी सहकार्याने घडत आहे.

भारतातील शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायती, व्यवसाय आणि प्रशासकीय यंत्रणा यांचे किफायतशीर खर्चात डिजिटल रूपांतरण करत डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने संगमेश्वर वैजनाथ



गुरूशेटे व सागर गोविंद शिंदे या दोन अभियंत्यामार्फत स्टार्टअपची उभारणी करण्यात आली आहे.

युगांतर एक्समार्फत अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करून आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, क्लाउड कम्प्युटिंग, डेटा ॲनालिटिक्स आणि सायबरसुरक्षा विविध घटकासाठी जसे शासन, शेती, शिक्षण, आरोग्य आणि वित्तीय क्षेत्रासाठी अनेक नाविन्यपूर्ण डिजिटल सोल्युशन्स विकसित केले जात आहे. विशेषतः ई-गव्हर्नन्स पोर्टल्स, ईआरपी सिस्टम्स, स्मार्ट एपीआय, एडटेक, ॲग्रीटेक आणि फिनटेक सोल्युशन्स तयार करून देण्याकरिता सुसज्य आहे. शासकीय निकषांचे काटेकोर पालन करत, विविध संस्थांना विश्वासार्ह तांत्रिक सेवा पुरवणारे हे स्टार्टअप आज भारताचा टेक्नॉलॉजिकल ट्रस्ट पार्टनर म्हणून नावाला येत आहे. ‘विकसित भारत २०४७’साठी भारताला जागतिक तंत्रज्ञान नेतृत्वाच्या शिखरावर नेण्याच्या दिशेने युगांतर एक्स सज्ज असून, ग्रामपंचायती, शैक्षणिक संस्था, स्टार्टअप्स आणि नवउद्योजकांमध्ये डिजिटल जागरूकता वाढवण्याचे त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

‘युगांतर एक्स’ हे स्वदेशी सर्जनशीलतेचं जिवंत उदाहरण असून ते डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवण्याचे कार्य करत आहे. ही भारताच्या तांत्रिक आत्मनिर्भरतेची अभिमानास्पद ओळख ठरत आहे. या स्टार्टअपच्या उभारणीकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरमार्फत स्टार्टअप उभारणीच्या विविध टप्प्यावर मदत मदत करण्यात आली आहे.

**ही केवळ स्टार्टअपची नाही, तर नवभारताच्या नवयुगाची सुरुवात आहे. आमचे ध्येय प्रत्येक गाव आणि संस्थेला डिजिटल सक्षम बनवण्याचे आहे.**

**-संगमेश्वर वैजनाथ गुरूशेटे, तंत्रज्ञानप्रेमी युवा उद्योजक**

**आम्ही कोड लिहित नाही देशाचे भविष्य घडवतो. व्हिजन २०४७पर्यंत भारताला सर्वश्रेष्ठ डिजिटल राष्ट्र बनवणं हे आमचं मिशन आहे.**

**-सागर गोविंद शिंदे, तंत्रज्ञानप्रेमी युवा उद्योजक**

# जो रूटचे ऐतिहासिक शतक

## चौथ्या कसोटीत इंग्लंडकडे आघाडी

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा कसोटी सामना मँचेस्टरच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. रूटने १७८ चेंडूंचा सामना करत आपले शतक पूर्ण केले आहे. यासह कसोटी क्रिकेटमधील मोठ्या विक्रमात त्याने कुमार संगकाराच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. तो भारताविरुद्ध सर्वाधिक शतके झळकावणारा फलंदाजदेखील ठरला आहे.

फॅब ४मध्ये अव्वल स्थानी असलेल्या जो रूटने कसोटी क्रिकेटमध्ये आपली दमदार कामगिरी सुरू ठेवली आहे. मँचेस्टर कसोटीतील पहिल्या डावात फलंदाजी करताना आधी त्याने ओली पोपसोबत मिळून महत्त्वपूर्ण भागीदारी केली. पोप बाद झाल्यानंतर त्याने बेन स्टोक्ससोबत मिळून संघाची धावसंख्या ४०० धावांच्या पार पोहचवली. यादरम्यान त्याने आपले शतक पूर्ण केलं. यासह कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत



त्याने श्रीलंकेचा दिग्गज फलंदाज कुमार संगकाराच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

हे जो रूटच्या कसोटी कारकिर्दीतील ३८वे शतक ठरले आहे. कुमार संगकाराच्या नावेदेखील कसोटी क्रिकेटमध्ये इतकीच शतके झळकावण्याची नोंद आहे.

जो रूट हा कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघाविरूद्ध सर्वाधिक शतकं झळकावणारा फलंदाज ठरला आहे. मँचेस्टरच्या मैदानावर झळकावलेले हे भारताविरुद्ध १२वे शतक ठरले आहे. याआधी स्टीव्ह स्मिथने ११ शतके झळकावली होती.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर अव्वल स्थानी आहे. सचिनने कसोटी क्रिकेटमध्ये ५१ शतके झळकावली आहेत, तर दुसऱ्या स्थानी असलेल्या जॅक कॅलिसने ४५ शतके झळकावली आहेत. तिसऱ्या स्थानी रिकी पॉँटिंगच्या नावे ४१ शतके झळकावण्याची नोंद आहे, तर चौथ्या स्थानी असलेल्या कुमार संगकाराने ३८ शतके झळकावली आहेत. आता जो रूटदेखील ३८ शतकांसह संयुक्तरित्या चौथ्या स्थानी पोहचला आहे.

अंशुल कंबोजच्या गोलंदाजीवर फाइन लेगच्या दिशेने एक सहजसुंदर चौकार लगावत रूटने हा मैलाचा दगड गाठला. कालपासून अत्यंत शांत आणि संयमी वृत्तीने फलंदाजी करत त्याने आपली खेळी उभारली. सुरुवातीला सावध पवित्रा घेतल्यानंतर आज त्याने आपल्या अनुभवाचा आणि कौशल्याचा पुरेपूर वापर केला. वेगवान आणि फिरकी अशा दोन्ही प्रकारच्या गोलंदाजीचा त्याने समर्थपणे सामना केला. या खेळीदरम्यान काही चेंडू खाली राहिले आणि तो धावबाद होण्याच्या धोक्यातूनही थोडक्यात बचावला, परंतु या सर्व अडथळ्यांवर मात करत त्याने संघासाठी एक अविस्मरणीय खेळी साकारली. शतक पूर्ण होताच त्याने हेल्मेट काढून चाहत्यांचे अभिवादन स्वीकारले, तर स्टँड्समधील इंग्लिश चाहत्यांनी 'रूट'च्या नावाचा असा जयघोष करत त्याला दाद दिली. कर्णधार बेन स्टोक्सने त्याला कडकडून मिठी मारत त्याचे अभिनंदन केले.

# पंतने टाकले 'हिटमॅन' रोहितला मागे

## कसोटीत सर्वाधिक षटकार मारणारा बनला दुसरा फलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पहिल्या डावात दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेलेला ऋषभ पंत दुसऱ्या दिवशी फलंदाजीसाठी मैदानात आला. पंतने या खेळीत शानदार अर्धशतक झळकावले. त्याने रोहित शर्माचा मोठा विक्रम मोडला आणि वीरेंद्र सेहवागच्या विक्रमाची बरोबरीही केली.

ऋषभ पंत भारतीय संघासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा दुसरा फलंदाज बनला आहे. त्याने माजी कर्णधार रोहित शर्माला मागे टाकले आहे, जो अलीकडेच कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे. 'हिटमॅन' शर्माने देशासाठी ६७ कसोटी सामने खेळताना ११६ डावांमध्ये ८८ षटकार मारले होते, तर पंतच्या षटकारांची संख्या ८९ झाली आहे.

भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागच्या नावावर आहे. ४६ वर्षीय माजी क्रिकेटपटूने



२००१ ते २०१३दरम्यान कसोटी क्रिकेटमध्ये देशासाठी १०४ सामन्यांमध्ये भाग घेतला होता. यादरम्यान त्याने १८० डावांमध्ये ९१ षटकार मारण्यात यश मिळवले.

सध्या वीरेंद्र सेहवाग आणि रोहित शर्मा दोघांनीही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. अशा परिस्थितीत जर पंतने भविष्यात आणखी तीन षटकार मारले, तर तो देशासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा पहिला खेळाडू बनेल.

विशेष म्हणजे ऋषभ पंतच्या पायाच्या बोटाला पहिल्या दिवशी फलंदाजी करताना असताना दुखापत झाली होती. दुसऱ्या दिवशी पंतच्या बोटाला फ्रॅक्चर असताना पंत फलंदाजीला उतरणार नाही असेच अनेकांना वाटत होते, पण ऋषभ पंतच्या जिद्दीने सर्वांनाच खोटे ठरवले. तो मैदानावर फलंदाजीला उतरला. फक्त फलंदाजीला उतरला नाही, तर त्याने अर्धशतकी खेळी केली.

# वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये डिव्हिलियर्सचे शतक

**लीसेस्टर सिटी : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज एबी डिव्हिलियर्स हा आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखळा जातो. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केला आहे, पण त्याच्या फलंदाजीतील आक्रमकता अजूनही कमी झालेली नाही. सध्या तो वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स स्पर्धेत दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाचे नेतृत्व करत आहे. या संघाकडून फलंदाजी करताना त्याने इंग्लंड चॅम्पियन्सकडून खेळताना दमदार शतकी खेळी केली. यासह आपल्या संघाला सलग तिसरा विजय मिळवून दिला.

या सामन्यात दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंड चॅम्पियन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५२ धावा केल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १५३ धावा करायच्या होत्या. हे आव्हान दक्षिण आफ्रिकेने १२.२ षटकात पूर्ण केले. यासह हा सामना १० गडी राखून आपल्या नावावर केला. सलग तीन सामने जिंकून दक्षिण आफ्रिकेचा संघ सहा गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचला आहे.

या सामन्यात धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिका संघाकडून एबी डिव्हिलियर्सने दमदार शतक झळकावले. त्याने २० चेंडूत आपले अर्धशतक, तर ४१ चेंडूंचा सामना करत शतक पूर्ण केले. या खेळीदरम्यान त्याने सात षटकार आणि १५ चौकार मारले. या डावात त्याने ११६ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाकडून हाशिम आमला आणि डिव्हिलियर्सची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानावर आली होती. दोघांनी मिळून दिलेले आव्हान पूर्ण केले.

# डब्ल्यूडब्ल्यूई स्टार हल्क होगनचे निधन

**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

८०च्या दशकातील चाहत्यांचा 'बालपणीचा हिरो' सुप्रसिद्ध डब्ल्यूडब्ल्यूई सुपरस्टार हल्क होगन याचे वयाच्या ७१व्या वर्षी निधन झाले. हॉगन याला हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्याचे निधन झाले.

वृत्तानुसार फ्लोरिडातील क्लियरवॉटर येथील हल्क हॉगनच्या घरी डॉक्टरांना बोलावण्यात आले. त्याला तातडीने रुग्णालयात घेऊन जाण्यात आले, पण त्याआधीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे समजले. टेरी बोलेआ असे त्याचे खरे नाव होते. कुस्तीपटू म्हणून करिअर करण्यासाठी त्याने हल्क हॉगन हे नाव निवडले होते. सुरुवातीच्या काळात तो विन्स मॅकमोहनच्या डब्ल्यूडब्ल्यूएफच्या प्लॅनचा चेहरा बनला. रेसलमेनिया ३मध्ये आंद्रे द जायंटविरुद्धचा त्याचा ऐतिहासिक सामना विक्रमी ९३ हजारहून अधिक लोकांनी थेट पाहिला होता.

# पंतच्या लढवय्या बाण्याने झुंझार खेळाडूंच्या कहाणीला उजाळा

**लंडन : वृत्तसंस्था**

ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर आज एका अविश्वसनीय आणि तितक्याच धाडसी दृश्याने क्रिकेटजगताचे लक्ष वेधून घेतले. भारतीय संघाचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत पायाला गंभीर दुखापत झालेली असतानाही वेदनांवर मात करत संघासाठी फलंदाजीस उतरला. शार्दूल ठाकूर बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमधून लंगडतच मैदानाच्या दिशेने येणाऱ्या पंतला पाहून उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उभे राहून मानवंदना दिली.

२००२मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या अँटिग्वा कसोटी सामन्यात भारताचा दिग्गज फिरकीपटू अनिल कुंबळेचा सामन्यादरम्यान त्याचा जबडा तुटला होता. डॉक्टरांनी त्याला विश्रांतीचा सल्ला दिला होता, पण कुंबळे थांबला नाही. चेहरा बँडेजने बांधलेल्या अवस्थेत ते पुन्हा मैदानावर उतरला. वेदनांनी ग्रासले असताना त्याने गोलंदाजी करत ब्रायन लारासारख्या दिग्गज फलंदाजाला तंबूत धाडले. त्याच्या या त्यागाने भारतीय संघाला केवळ आघाडी मिळवून दिली नाही, तर प्रत्येक क्रिकेटप्रेमीच्या मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला.

२०२३च्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाचा





विस्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात एक अविस्मरणीय खेळी साकारली. पायाला क्रॅम्प्स आणि कमरेच्या दुखापतीने त्रस्त असताना मॅक्सवेलने मैदान सोडण्यास नकार दिला. ऑस्ट्रेलिया ९१ धावांवर ७ बाद असताना मॅक्सवेलने एकट्याच्या जोरावर २०१ धावांची नाबाद खेळी केली, ज्यात २१ चौकार आणि १० षटकारांचा समावेश होता. त्याच्या या खेळीने ऑस्ट्रेलियाला केवळ विजय मिळवून दिला नाही, तर विश्वचषकातील सेमीफायनलचे तिकीटही निश्चित केले.

२०२३च्या ॲशेस मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा फिरकीपटू नॅथ लायनला क्षेत्ररक्षण करताना पायाच्या स्नायूंना गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे तो चालू शकत नव्हता. तरीही ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीच्या संकटकाळात तो लंगडत लंगडत फलंदाजीला उतरला आणि १६ धावांची छोटी, पण महत्त्वाची खेळी केली. त्याच्या या धैर्याने ऑस्ट्रेलियाला आघाडी मिळवून दिली.

२०२४मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या गाबा कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजचा नवोदित वेगवान गोलंदाज शमर जोसेफने क्रिकेटविश्वाला आश्चर्यचकित केले. दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना त्याच्या पायाच्या अंगठ्याला गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले, पण सामन्याच्या निर्णायक क्षणी शमर पुन्हा मैदानावर परतला. वेदनांवर मात करत त्याने सात विकेट्स घेतल्या,

वेस्ट इंडिजचा दिग्गज वेगवान गोलंदाज माल्कम मार्शला १९८४मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात हाताला फ्रॅक्चर झाले, पण मार्शलने मैदान सोडण्यास नकार दिला. हाताला प्लॅस्टर बांधून त्याने गोलंदाजी केली आणि सात विकेट्स घेतल्या. त्याच्या या कृतीने वेस्ट इंडीजला विजय मिळवून दिला आणि मार्शलच्या नावाने क्रिकेटच्या इतिहासात एक अध्याय लिहिला गेला.

२००५च्या ॲशेस मालिकेत ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह वॉ दुखापतींशी झुंजत होता. त्याच्या खांद्याला व पायाला दुखापत असतानाही त्याने प्रत्येक सामन्यात फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात छाप पाडली. त्याच्या लढवय्या वृत्तीमुळे ऑस्ट्रेलियाने मालिका जिंकली.

२०११च्या विश्वचषकात भारताचा अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगने कॅन्सरया दुर्धर आजाराशी झुंज देता देता संघासाठी अप्रतिम कामगिरी केली. त्याने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात आपले संस्मरणीय योगदान दिले. या लढवय्या वृत्तीमुळे भारताने विश्वचषक जिंकला.

# यश दयालविरुद्ध आणखी एका तरुणीची तक्रार

**जयपूर** : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा गोलंदाज यश दयाल याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. गाझियाबादनंतर आता जयपूरमध्येही त्याच्यावर एका तरुणीने बलात्काराचा आरोप केला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून सांगानेर पोलीस ठाण्यात यश दयालविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार दोन वर्षांपूर्वी ती अल्पवयीन असताना तिची ओळख यशसोबत झाली होती. क्रिकेट खेळत असल्यामुळे दोघांमध्ये संपर्क वाढला. यशने तरुणीला क्रिकेटमध्ये करिअर घडवण्यासाठी टिप्स देण्याच्या बहाण्याने जवळीक साधली. आयपीएल २०२५दरम्यान सामन्यासाठी जयपूरला आला असताना यशने तिला सीतापुरा येथील एका हॉटेलमध्ये बोलावले आणि तिच्यावर बलात्कार केला.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com